## ...म्हणून राजपथावरील संचलन यंदा उशिराने



**नवी दिल्ली :** राजधानी दिल्लीत प्रजासत्ताक दिनी राजपथावरील संचलन दरवर्षी सकाळी १० वाजता सुरू होत असते, पण यंदा पहिल्यांदाच हे संचलन अर्धा तास उशिराने सुरू होणार आहे. यामागे कोरोना निर्बंध आणि जम्मू काश्मीरमध्ये सुरक्षा दलाच्या शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करणे ही कारणे आहेत. एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, दरवर्षी प्रजासत्ताक संचलन सकाळी १० वाजता सुरू होते. या वर्षी मात्र हे संचलन १०.३० वाजता सुरू होईल. कोरोना निर्बंध आणि संचलनाआधी जम्मू काश्मीरमध्ये शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली वाहण्यात येणार आहे. यामुळे हा उशीर होईल. याशिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी इंडिया गेटजवळील नॅशनल वॉर मेमोरियलला भेट देतील, तर सांस्कृतिक वैविध्य, सामाजिक आणि आर्थिक प्रगतीचे रथदेखील संचलित होतील.


बुधवार, १९ जानेवारी २०२२

◆ वर्ष १४ ◆ अंक १८३

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


## अंतरंग


शिवरायांच्या गडकिल्ल्यांसाठी भाजपचा पुढाकार/२

रोह्यातील कमानीला सी. डी. देशमुख यांचेच नाव/५

भारत-आफ्रिका यांच्यात आज पहिली वन डे/६


# नाना पटोलेंवर गुन्हा दाखल करा

## पंतप्रधानांबद्दल केलेल्या वादग्रस्त विधानप्रकरणी फडणवीसांची मागणी

**पणजी : वृत्तसंस्था**

काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. केवळ शारिरीक उंची असून चालत नाही, तर वैचारिक-बौद्धीक उंचीसुद्धा असावी लागते, असा टोलाही फडणवीस यांनी लगावला आहे.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी 'मी मोदी यांना मारू शकतो', 'शिवी देऊ शकतो', असे वादग्रस्त वक्तव्य केल्याने राजकीय वर्तुळात वादळ उठले आहे. भंडारा जिल्ह्यातील लाखनी येथे कार्यकर्त्यांशी बोलताना पटोले यांनी हे वक्तव्य केले. त्यांच्या या विधानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरलही झाला आहे. सर्वच राजकीय पक्षांकडून पटोले यांच्या विधानाची निंदा केली जात आहे. भाजप नेते व विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनीही पटोलेंच्या वक्तव्याचा समाचार घेतला आहे.

पंजाबमध्ये पंतप्रधान मोदी यांचा ताफा २० मिनिटे खोळंबून राहातो, पण काँग्रेसचे मुख्यमंत्री त्याची साधी दखलसुद्धा घेत नाहीत. आता महाराष्ट्राचे काँग्रेस अध्यक्ष म्हणतात मी मोदींना मारू शकतो. काँग्रेस पक्षात चाललंय तरी काय? कधी काळी स्वातंत्र्याच्या आंदोलनात असणारा हा पक्ष इतक्या रसातळाला गेला आहे. सत्तेसाठी काहीही. काँग्रेसला राजकीय पक्ष म्हणायचे की दहशत पसरवणारी संघटना, अशा शब्दांत फडणवीसांनी फटकारले. **(पान २ वर..)**



### 'त्या' दाव्याचे पोलिसांकडून खंडन

**भंडारा :** मोदी नावाच्या गावगुंडाला भंडारा पोलिसांनी अटक केल्याचा दावा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला होता, पण आता त्यांनाच तोंडावर पडण्याची वेळ आली आहे. कारण त्यांचा हा दावा भंडारा पोलिसांनी खोडून काढला आहे. आम्ही मोदी नावाच्या कोणालाही अटक केलेली नाही, असे स्पष्टीकरण पोलिसांनी दिले. त्यामुळे हे प्रकरण पटोलेंना शेकणार असल्याचे दिसत आहे.

***वादग्रस्त विधान करणे हा नाना पटोलेंचा स्वभाव आहे. त्यांच्या नेत्यांकडून त्यांनी गुण घेतले आहेत. हम करे सो कायदा असे राज्यातील चित्र सध्या आहे. आम्ही याची तक्रार राज्यपालांकडे केली आहे, तसेच पटोलेंच्या विरोधात कोर्टातही जाणार आहोत.***

**-चंद्रकांत पाटील, भाजप प्रदेशाध्यक्ष**



# लढवय्ये नेते प्रा. एन. डी. पाटील यांना अखेरचा निरोप

### कोल्हापूरमध्ये शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ज्येष्ठ नेते प्रा. एन. डी. पाटील यांच्यावर मंगळवारी (दि. १८) कोल्हापूर कसबा बावडा येथील स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. दोन्ही मुलांनी त्यांना मुखाग्नी दिला. या वेळी 'एन. डी. पाटील अमर रहे' अशा घोषणा देण्यात आल्या.



तत्पूर्वी एन. डी. पाटील यांचे पार्थिव रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शाहू कॉलेज प्रांगणात अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. या वेळी 'रयत'चे अध्यक्ष खासदार शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, कोल्हापूरचे पालकमंत्री सतेज पाटील, ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, चळवळीतील नेते, विविध संस्था-संघटनांचे प्रतिनिधी व नागरिकांनी अंत्यदर्शनासाठी रीघ लावली.

दुपारी एकच्या सुमारास एन. डी. पाटील यांचे पार्थिव अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमीत आणण्यात आले. तेथे सर्व मान्यवरांनी अंत्यदर्शन घेतल्यानंतर मुलगा सुहास व प्रशांत यांनी पार्थिवाला भडाग्नी दिला. पुरोगामी चळवळीतील बिनीचे शिलेदार, विचारवंत, प्रभावी वक्ते आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाण असलेला नेता म्हणून पाटील यांची ओळख होती. या वेळी त्यांच्याविषयीच्या आठवणींनी सारेच गहिवरले.

# लसीकरणाची वर्षपूर्ती : आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून पंतप्रधानांचे अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोजगार, शिक्षण आणि उपजीविकेची सर्व साधने अबाधित रहावीत या उद्देशाने गेल्या वर्षभरात तंत्रज्ञानावर भर देत भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने राबविलेल्या जगातील सर्वांत मोठ्या कोविड लसीकरण मोहिमेस नुकतेच (दि. १६) एक वर्ष पूर्ण झाले. या काळात मोदी सरकारच्या कोरोनाविरोधी लढाईस लसीकरणामुळे मोठे बळ मिळाले असून देशाचे जनजीवन वेगाने पूर्वपदावर येत असल्याबद्दल भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी मोदी सरकारचे जाहीर अभिनंदन केले.

एका बाजूला सर्वाधिक सुरक्षा उपायाचा अवलंब करतानाही जनजीवन पूर्वपदावर येण्याकरिता केंद्र सरकार आटोकाट प्रयत्न करीत असताना महाराष्ट्र मात्र पुन्हा सर्व व्यवहार बंद करून राज्याला अस्थिरतेकडे नेत आहे, असा आरोपही त्यांनी केला आहे.

### 'विकासाचा उंचावता आलेख ही मोदी सरकारची प्रशंसनीय कामगिरी!'



गेल्या वर्षी १६ जानेवारी २०२१ रोजी मनीष कुमार नावाच्या ३४ वर्षीय सफाई कर्मचाऱ्यास कोविडविरोधी लसीची पहिली मात्रा देऊन या मोहिमेचा आरंभ करण्यात आला. १४ जानेवारी २०२२ रोजी या मोहिमेंतर्गत लसीकरणाच्या १५६ कोटी मात्रा पूर्ण झाल्या असून ९३ टक्के जनतेचे पहिल्या मात्रेचे, तर ७० टक्के जनतेचे दोनही मात्रांचे लसीकरण पूर्ण झाले आहे. दररोज सरासरी ४३ लाख लोकांचे लसीकरण करणारी जगातील ही सर्वाधिक वेगवान मोहीम मोदी सरकारमुळेच देशात राबविली गेल्याने देशाला कोविडविरोधी सुरक्षेचे मोठे कवच प्राप्त झाले आहे, असे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले. कालपर्यंत देशातील १५ ते १८ वयोगटातील ४३ टक्के युवकांना पहिली मात्रा पूर्ण झाली आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

तेलंगणा, गोवा, सिक्कीम, दादरा-नगर हवेली, दीव-दमण, लडाख, लक्षद्वीप येथे पहिल्या मात्रेचे १०० टक्के लसीकरण पूर्ण झाले असून मोहिमेच्या पहिल्या ७८ दिवसांतच भारताने १०० कोटी लसीकरणाचे उद्दिष्ट पूर्ण करून जागतिक स्तरावर मोठी आघाडी नोंदविली आहे. १७ सप्टेंबर या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवशी, एकाच दिवशी अडीच कोटी लसीकरण करून जगभरातील लसीकरणाच्या मोहिमांतील विक्रमही भारतानेच प्रस्थापित केला ही अभिमानास्पद बाब आहे, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी नमूद केले.

केवळ देशांतर्गत लसीकरणच नव्हे, तर वसुधैव कुटुम्बकम या वैश्विक भावनेने व सर्वे भवन्तु सुखिनः या सांस्कृतिक परंपरेनुसार जगातील ९४हून अधिक देशांना सव्वासात कोटी लसमात्रांचा पुरवठा करून मोदी सरकारने विश्वकल्याणाच्या संस्काराचे दर्शन घडविले आहे, असे गौरवोद्गार आमदार प्रशांत ठाकूर यांनी काढले. **(पान २ वर..)**

## निवडक

### प्रजासत्ताक दिनी दहशतवादी हल्ल्याचा कट; यंत्रणा सतर्क

**नवी दिल्ली :** प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर गुप्तचर यंत्रणांना दहशतवादी हल्ल्याचा कट रचण्यात आल्यासंदर्भातील इशारा मिळाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींबरोबरच प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणाऱ्या मान्यवरांच्या जीवाला यामुळे धोका निर्माण होऊ शकतो. याचबरोबरच सार्वजनिक ठिकाणे, महत्त्वाच्या इमारती आणि गर्दीच्या ठिकाणांवर हल्ला करण्याचा या दहशतवादी गटांचा विचार असल्याचेही अहवालात म्हटले आहे. यामुळे सुरक्षा यंत्रणा अलर्ट झाल्या आहेत.

### कोरोना संसर्गवाढ; केंद्राचे राज्यांना निर्देश

**नवी दिल्ली :** देशात सध्या कोरोनाचा संसर्ग वेगाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने राज्यांना आणि केंद्र शासित प्रदेशांना महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. ज्या भागांमध्ये कोरोनाचा संसर्ग वाढतोय त्या भागांमध्ये चाचण्यांचे प्रमाण वाढवण्यात यावे, असे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे.

# खांदा कॉलनी भाजप, युवा मोर्चाची कार्यकारिणी जाहीर

### ■ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष खांदा कॉलनी विभागीय कमिटीची आणि युवा मोर्चाची कार्यकारिणी सोमवारी (दि. १७) जाहीर झाली. यामध्ये भाजप खांदा कॉलनी अध्यक्षपदी नगरसेवक एकनाथ गायकवाड आणि युवा मोर्चा अध्यक्षपदी अभिषेक भोपी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

भाजपच्या खांदा कॉलनीतील कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, उपमहापौर सीताताई पाटील, नगरसेवक एकनाथ गायकवाड, तेजस कांडपिळे, पनवेल शहर सरचिटणीस अमरीश मोकल, ओबीसी मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष रामनाथ पाटील, खांदा कॉलनी शहर अध्यक्ष शांताराम महाडीक यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

भाजप प्रभाग क्रमांक १५, खांदा कॉलनी विभागीय अध्यक्षपदी नगरसेवक एकनाथ गायकवाड, कार्याध्यक्षपदी जितेंद्र माने, सरचिटणीसपदी संजय कांबळे, भीमराव पोवार, उपाध्यक्षपदी नितीन विचारे, प्रकाश खानावकर, सचिन मोरे, सचिन गायकवाड, चिटणीसपदी प्रवीण भोसले, नामदेव कोरे, संतोष लोटणकर, मच्छिंद्र वर्तक, खजिनदारपदी राजू महापूरकर, सदस्य म्हणून दीपक जांभळे, प्रवीण वर्तक, अंकुश खरमाटे, सुहास पाटील, चेतन जाधव, नामदेव मुळीक, युवराज बेंडसे, देवानंद म्हात्रे, तानाजी करवीर, मिथुन दर्गे, जितेंद्र निंबाळकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे, तर युवा मोर्चा खांदा कॉलनी अध्यक्षपदी अभिषेक भोपी, सरचिटणीसपदी रोहित कोळी, **(पान २ वर..)**

# अनिल देशमुखांना झटका!

## विशेष न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळला



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील विशेष न्यायालयाने माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अनिल देशमुख यांना झटका दिला आहे. न्यायालयाने देशमुख यांचा मनी लॉंडरिंग प्रकरणातील डिफॉल्ट बेलचा अर्ज फेटाळला. सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) देशमुख यांना २ नोव्हेंबर २०२१ रोजी अटक केली. ईडीने देशमुख हेच सचिन वाझेने डिसेंबर २०२० ते मार्च २०२१मध्ये बार मालकांकडून वसुल केलेल्या खंडणीचे मुख्य लाभार्थी असल्याचा आरोप केला आहे.

विशेष न्यायालयाचे न्यायाधीश आर. एन. रोकडे यांनी अनिल देशमुख यांचा जामीन अर्ज फेटाळला. देशमुख यांच्या वकिलाने न्यायालयीने कोठडी ६० दिवसांपेक्षा अधिक काळ वाढवण्यात आल्याचा आणि ईडी न्यायालयाची दिशाभूल करीत असल्याचा युक्तीवाद केला, तसेच अद्याप न्यायालयाने ईडीच्या आरोपपत्राची दखल घेतली नसल्याचाही मुद्दा मांडला.

ईडीने अनिल देशमुख यांच्याविरोधात २९ डिसेंबर २०२१ रोजी पुरवणी आरोपपत्र दाखल केलेले आहे. न्यायालयात ईडीने देशमुख यांच्या जामिनाला विरोध केला. निश्चित वेळेआधी आरोपपत्र दाखल झाल्यास आरोपीला डिफॉल्ट बेल मागता येत नाही, असा युक्तिवाद ईडीकडून करण्यात आला.

अनिल देशमुख यांच्यावर मुंबई पोलीस आयुक्त परमबीर सिंह आणि पोलीस निरिक्षक सचिन वाझे यांनी १०० कोटी खंडणी गोळा करण्यास सांगितल्याचा गंभीर आरोप केलेला आहे. हे प्रकरण न्यायालयात गेल्यानंतर कोर्टाने या प्रकरणात गुन्हा दाखल करून सीबीआय चौकशीचे आदेश दिले. सीबीआयने गुन्हा दाखल केल्यानंतर ईडीनेदेखील या प्रकरणात कारवाईस सुरुवात केली. देशमुख यांच्यावर आपल्या पदाचा गैरवापर करून भ्रष्टाचार केल्याचा आणि बेनामी संपत्ती गोळा केल्याचा ठपका आहे. हे प्रकरण उजेडात आल्याने राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली आणि देशमुख यांना राजीनामा द्यावा लागला होता. सध्या ते जेलची हवा खात आहेत.

# पनवेलमध्ये महापौर सहाय्यता निधीतून गरजूंना मदत



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापौर सहाय्यता निधी अंतर्गत मंगळवारी (दि. १८) दोन लाभार्थ्यांना वैद्यकीय कारणास्तव ४० हजारांची मदत करण्यात आली. या वेळी महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील आणि सचिव तिलकराज खापर्डे उपस्थित होते.

महापौर सहाय्यता निधीच्या माध्यमातून वैद्यकीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना वैद्यकीय कारणांसाठी, तसेच अपघात किंवा नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांच्या लोकसहभागातून महापौर निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या अंतर्गत गंभीर आजारांसाठी (कोविड-१९, हृदयरोग, मेंदू संबधित उपचार, तसेच शस्त्रक्रिया, कॅन्सर शस्त्रक्रिया, ल्युकेमीया, थॅलेसीमीया, क्षयरोग, अवयव प्रत्यारोपण, डायलिसिस, बोनमॅरो) आर्थिक मदत करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या आपत्तीग्रस्तांना, अपघातामुळे मृत्यू किंवा कायमस्वरुपी दुखापत, कायमस्वरुपी अपंगत्व आलेल्यांना आर्थिक मदत करण्यात येत आहे.


महापौर निधीचा लाभ घेण्याकरिता महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरील अर्ज डाऊनलोड करून घ्यावा. या अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची माहिती आहे. अर्ज व कागदपत्रे महापालिकेला panvelcorporation@gmail.com या ई-मेलवर पाठवावी किंवा महापौर कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नगरपंचायतींसाठी शांततेत मतदान

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सहा नगरपंचायतींच्या २१ जागांसाठी मंगळवारी (दि. १८) मतदानप्रक्रिया झाली. मतदारांनी शांततेत मतदानाचा हक्क बजावला. १९ जानेवारीला मतमोजणी होईल.

जिल्ह्यातील सहा नगरपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक डिसेंबर महिन्यात झाली, मात्र ओबीसी आरक्षण रद्द झाल्यामुळे ओबीसी प्रवर्गाच्या राखीव २१ जागांसाठीची निवडणूक प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती. या जागा अनारक्षित करून पुन्हा निवडणूक जाहीर करण्यात आली. पोलादपूर, म्हसळा, माणगाव, तळा, पाली या पाच नगरपंचायतींमध्ये प्रत्येकी चार, तर खालापूर नगरपंचायतीमधील एक अशा २१ जागा असून त्यासाठी मतदान झाले. मतमोजणीअंती नगरपंचायत निवडणुकीच्या निकालाचे चित्र स्पष्ट होणार आहे.


पनवेल भाजपतर्फे

जनहितार्थ

माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत

बुधवार, दि. १९ जानेवारी २०२२ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर

२. काळण समाज हॉल, पनवेल

३. सेंट्रल रेल्वे, पनवेल

# गडकिल्ल्यांसाठी भाजपचा पुढाकार

## ■ पावित्र्य नष्ट करण्याचा प्रयत्न दक्षता समिती रोखणार

**मुंबई : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांवर विशिष्ट धर्माची स्थाने उभारण्याचे प्रकार गेल्या दोन वर्षांत चालू झाले आहेत. त्यामुळे गडकिल्ल्यांचे पावित्र्य नष्ट करण्याचे प्रयत्न रोखण्यासाठी भाजपच्या पदाधिकार्‍यांची दक्षता समिती स्थापन करत असल्याची घोषणा प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी मंगळवारी (दि. १८) केली.

चंद्रकांत पाटील म्हणाले की, काही दिवसांपूर्वी किल्ले रायगड येथे मदार मोर्चा येथे रंगरंगोटी करून व चादर चढवून त्याचे प्रार्थनास्थळ करण्याचा प्रयत्न केल्याचे उघड झाले. त्याच्याविरोधात छत्रपती खासदार संभाजीराजे यांनी पुरातत्व खात्याकडे पत्र पाठवून कारवाईची मागणी केली. विशेष म्हणजे स्थानिक शिवसेना आमदारांनी या विषयाकडे दुर्लक्ष केले पण संभाजीराजे यांनी आवाज उठवला. दुर्दैवाने राज्यात ठिकठिकाणी गडकिल्ल्यांवर असे प्रकार घडू लागले आहेत. शिवनेरी गडावर 'छत्रपती शिवाजी महाराजांचे अंगरक्षक सिद्दी इब्राहिम खान उद्यान' असा फलक लावला गेला. रत्नागिरी जिल्ह्यात महामार्गावर 'शिवाजी महाराजांचे गुरुवर्य पीरसाहेब यांच्या स्थानाकडे' असा बोर्ड झळकला. या प्रकारांविरोधात पोलिसांकडे तक्रारी केल्या की पोलीस ऐतिहासिक पुरावा मागतात आणि तक्रार घेत नाहीत. ऐतिहासिक बाबींचे सरसकट कागदोपत्री पुरावे मिळत नसल्याचा फायदा घेऊन मविआ सरकारच्या आशिर्वादाने व पोलिसांच्या मदतीने गडकिल्ल्यांचे पावित्र्य नष्ट केले जात आहे.

ते म्हणाले की, शिवसेनेने सत्तेसाठी हिंदुत्व सोडले आहे आणि तो पक्ष गडकिल्ल्यांचे पावित्र्य नष्ट करण्याकडे दुर्लक्ष करत असला तरी भाजप शिवरायांच्या इतिहासात बदल करणे सहन करणार नाही. त्यामुळेच भाजप पदाधिकार्‍यांची एक दक्षता समिती स्थापन करत आहोत. खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने केंद्राच्या पुरातत्व खात्याकडे निवेदन देऊन नुकतेच या प्रश्नाकडे लक्ष वेधले. केंद्र सरकार कारवाई करेलच, पण पक्ष म्हणून भाजपही या विषयावर पाठपुरावा करेल.

### ■ असे असेल समितीचे कार्य

*छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांचे पावित्र्य जपण्यासाठी भाजपची प्रदेश दक्षता समिती ही गडांना भेट देऊन गेल्या दोन वर्षात गडाचे पावित्र्य भंग करण्याचे कोणकोणते प्रयत्न झाले आहेत याची नोंद करेल. त्यानंतर संपूर्ण पक्ष जनजागृती करून गडांचे पावित्र्य जपण्यासाठी संघर्ष करेल. समितीचे अध्यक्ष खासदार रणजितसिंह हिंदुराव नाईक निंबाळकर, सदस्य खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, माजी आमदार नितीनराजे शिंदे, सातारा जिल्हाध्यक्ष विक्रम पावसकर, प्रदेश महिला मोर्चा चिटणीस वर्षा डहाळे, समितीचे मार्गदर्शक भाजप राष्ट्रीय सचिव सुनील देवधर असतील.*

# नाना पटोलेंना अटक करा –उपाध्ये

## पंतप्रधानांबद्दल केलेल्या विधानावरून मागणी

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधानांबद्दल संतापजनक वक्तव्य करणार्‍या काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यावर तातडीने गुन्हा दाखल करण्याऐवजी पोलीस भाजपच्या लोकप्रतिनिधींना आणि कार्यकर्त्यांनाच अटक करीत आहे. चोर सोडून संन्याशाला फाशी असा हा प्रकार असून पोलिसांनी पटोले यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना तातडीने अटक करावी, अशी मागणी प्रदेश भाजपाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी मंगळवारी (दि. १८) पत्रकार परिषदेत केली. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

उपाध्ये म्हणाले की, आपण पंतप्रधानांबद्दल बोललोच नव्हतो असा खुलासा पटोले यांनी केला असून हा खुलासा हास्यास्पद आहे. चोर तो चोर वर शिरजोर असाच हा प्रकार आहे. नारायण राणे यांना अटक करताना जो न्याय लावला तोच न्याय पटोले यांनाही लावावा. पंतप्रधानांबद्दल संतापजनक वक्तव्य करणार्‍या पटोलेंविरोधात तक्रार दाखल करून घेण्यास पोलीस तयार नाहीत.

कोरोनाविरोधी लसीकरणाच्या मोहिमेत देशाने उच्चांकी आघाडी घेतलेली असताना महाराष्ट्रात मात्र ठाकरे सरकारच्या निष्क्रियतेमुळे लसीकरणाचा वेग थंडावल्याने कोरोनाचे भय कायम राहिले आहे असा थेट ठपका उपाध्ये यांनी या वेळी ठेवला.

कोरोनाची तिसरी लाट येण्याची भीती महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वारंवार जनतेस दाखवत होते. मात्र, लसीकरणाचा वेग वाढवून नागरिकांना सुरक्षित करण्याऐवजी घराबाहेर न पडण्याचा सल्ला देत ते स्वतःदेखील घरातच बसून राहिले. सर्व व्यवहार गुंडाळून व घराबाहेर जाणे टाळून ही लाट थोपविण्याचा मुख्यमंत्र्यांचा अजब 'गनिमी कावा' महाराष्ट्राच्या अंगलट आला असून, देश लसीकरणाचा विक्रम करत असताना महाराष्ट्रात मात्र फैलावाचा विक्रम होत आहे, असा आरोप उपाध्ये यांनी केला.

लसमात्रांचा अतिरिक्त साठा महाराष्ट्राकडे असल्याचे स्पष्ट होऊन राज्य सरकारचा खोटेपणा समोर आला व ढिसाळपणा हेच लसीकरण मंदावल्याचे कारणही उघड झाले. आता खुद्द आरोग्यमंत्र्यांनीच कमी लसीकरणाची कबुली दिली आहे. महाराष्ट्र हे मार्गदर्शक राज्य आहे, असे आरोग्यमंत्री म्हणत असले, तरी आता अन्य राज्यांकडून मार्गदर्शन घेण्याची वेळ महाराष्ट्रावर आली आहे. सरकारी बेफिकीरीचा फटका जनतेस बसत असेल तर त्याची जबाबदारी सरकारला घ्यावी लागेल, असा इशाराही उपाध्ये यांनी दिला.

# पोलादपुरात शिवसेनेने विकासकामेच केली नाहीत –आदिती तटकरे

**पोलादपूर : प्रतिनिधी**



तालुक्याची ग्रामपंचायत असलेल्या पोलादपूरचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर झाल्यावर शिवसेनेने शहरीकरणासाठी विकासकामे केली नाहीत, याची मतदार जनतेत तीव्र नाराजी आहे, अशी खंत रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केली.

पोलादपूर नगरपंचायतीच्या प्रभाग १०च्या उमेदवार शुभांगी चव्हाण, प्रभाग ८ च्या उमेदवार अनिता जांभळेकर, प्रभाग १४च्या उमेदवार प्रतिक्षा भुतकर आणि प्रभाग २चे उमेदवार अल्पेश मोहिते यांच्या प्रचाररॅलीनंतर पालकमंत्री आदिती तटकरे यांनी प्रभाग १० मध्ये शुभांगी चव्हाण आणि प्रभाग ८ मध्ये अनिता जांभळेकर यांच्या प्रचाराची सभा घेतली. त्या वेळी त्या बोलत होत्या.

माजी सभापती दिलीप भागवत यांनी शिवसेनेने सत्तेत आल्यानंतर विकासकामे तर केली नाहीच, पण जे काही ५० नारळ फोडले त्याची विकासकामेही न केल्याने मतदारांचा हिरमोड झाला आहे, असेही आदिती तटकरे या वेळी म्हणाल्या.

या वेळी व्यासपीठावर माजी सभापती दिलीप भागवत, उपसभापती शैलेश सलागरे, शहरअध्यक्ष अमोल भुवड, तालुकाअध्यक्ष अजय सलागरे, काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस धनंजय देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस शहरअध्यक्ष अजित खेडेकर, श्रावणी शहा तसेच उमेदवार उपस्थित होते.



**पनवेल : महापालिकेच्या कार्यालयाजवळ विकास जाधव यांनी ब्रदर्स कलेक्शन या नावाने सुरू केलेल्या कपड्यांच्या दुकानाचे उद्‌घाटन महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी झाले. या वेळी नगरसेवक नितीन पाटील, समीर ठाकूर, अजय बहिरा, नगरसेविका रूचिता लोंढे, प्रभाग क्रमांक १९ अध्यक्ष पवन सोनी, कामगार नेते अनिल जाधव, विजय जाधव, सविता जाधव, संजय जाधव, रजनिश जाधव, नरेश जाधव, अजिंक्य कांबळे, विराज जाधव, निकीता सोनावणे आदी उपस्थित होते.**

# पनवेल ते केवाडीया रेल्वे सुरू करा

## प्रवासी संघाची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल ते केवाडीया 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'पर्यंत रेल्वेसेवा देण्याची मागणी पनवेल प्रवासी संघाने रेल्वेच्या सर्व संबंधित रेल्वे प्रशासनाकडे केली आहे.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या भव्य पुर्णाकृती पुतळा गुजरात शासनाने केवाडीया येथे उभारला असून ते एक अद्भूत पर्यटन स्थळ ठरले आहे. ते गोवा, कोंकण, नवी मुंबई येथील जनतेला पहाण्यासाठी व पर्यटन धोरणाला चालना देण्यासाठी मध्य रेल्वेने पश्चिम रेल्वेच्या सहयोगाने पनवेल ते केवाडीया अशी नियमित पर्यटन रेल्वे सेवा सुरू करावी, अशी मागणी पनवेल प्रवासी संघाने रेल्वेच्या सर्व संबंधित रेल्वे प्रशासनाकडे केली आहे. ही माहिती प्रवासी संघाचे पदाधिकारी डॉ. भक्तिकुमार दवे व श्रीकांत बापट यांनी दिली.

# रामशेठ ठाकूर विद्यालयात विद्यार्थ्यांचे लसीकरण

**खारघर : रामप्रहर वृत्त**





जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात मंगळवारी (दि. १८) १५ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी लसीकरण मोहिम राबविण्यात आली होती. न्यू इंग्लिश स्कूल ओवेपेठ आणि रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील १५ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांनी या लसीकरण मोहिमेचा लाभ घेतला.

या कार्यक्रमास प्राचार्या दुर्गादेवी मौर्या यांचे मार्गदर्शन लाभले.त्याचप्रमाणे हा कार्यक्रम व्यवस्थित व्हावा, म्हणून पर्यावेक्षिका वीणा मॅडम, सर्व शिक्षकवृंद आणि सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स आणि सायन्सचे प्राचार्य डॉ. मराठे आणि न्यू इंग्लिश स्कूल, ओवेपेठ आणि रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, खारघरचे शाळा समिती सदस्य प्रभाकर जोशी यांनी या कार्यक्रमास आपली उपस्थिती दर्शविली.



या कार्यक्रमाकरिता संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, कार्यकारिणी सदस्य आमदार प्रशांत ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. गडदे यांचे सहकार्य लाभले.



**पनवेल : तालुक्यातील नितळस ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपचे भार्गव सांगडे यांची नुकतीच बिनविरोध निवड झाली आहे. त्याबद्दल त्यांचे भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी मंगळवारी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, के. सी. पाटील गुरुजी, माजी उपसरपंच कैलास मढवी, भाजप प्रवक्ते महादेव गडगे उपस्थित होते.**

**पान १ वरून**

## नाना पटोलेंवर गुन्हा दाखल करा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मारण्याची भाषा ज्यांनी केली, त्यांच्यावर काहीच कारवाई नाही आणि या अराजकतेवर कारवाईची मागणी करणार्‍या भाजपच्या लोकप्रतिनिधी–कार्यकर्त्यांना जागोजागी ताब्यात घेण्याची कार्यवाही केली जात आहे. कायद्याच्या कितीही चिंधड्या उडवा, वाट्टेल तसा पोलिसी दबाव आणा, पण भाजपचा कार्यकर्ता मूग गिळून गप्प बसणार नाही आणि या राज्यातील जनताही तुम्हाला माफ करणार नाही, असा हल्लाबोल फडणवीस यांनी केला.

राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पत्नीला राबडीदेवी म्हटले तर त्या व्यक्तीवर कारवाई करण्यात आली आणि इथे देशाच्या पंतप्रधानांना जीवे मारण्याची भाषा करतात, पण त्यांच्यावर महाराष्ट्रात गुन्हा दाखल होत नाही हे खूप चुकीचे आहे, असेही फडणवीस म्हणाले.

## लसीकरणाची वर्षपूर्ती : आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून पंतप्रधानांचे अभिनंदन

संख्येच्या हिशेबात पाहता भारताने इंग्लंडच्या लसीकरणाच्या २३ पट, जर्मनीच्या १९ पट, फ्रान्सच्या २३ पट, ब्राझीलच्या आठ पट, जपानच्या १२ पट, इटलीच्या २६ पट, स्पेनच्या ३३ पट, तर कोरियाच्या ३० पटीने अधिक लसीकरण विक्रमी वेळात पूर्ण केले, अशीही माहिती त्यांनी दिली.

संपूर्ण जग कोविड महामारीमुळे आर्थिक संकटाशी सामना करीत असताना भारताचा विकास दर मात्र उंचावत असून मोदी सरकारच्या आर्थिक नीतीमुळे विकासदराचा आलेख उंचावताना दिसत आहे. कोविड काळातदेखील भारताचा महागाई निर्देशांक सहा टक्क्यांहून सातत्याने कमी राहिला असून अर्थव्यवस्था झपाट्याने पूर्वपदावर येण्याचा वेग ९७.६ टक्के म्हणजे जगाच्या तुलनेत सर्वाधिक राहिला. जगभरातील अनेक वित्तसंस्था व अनेक राष्ट्रांच्या प्रमुखांनी याबद्दल मोदी सरकारची प्रशंसा केली असून भारताची प्रतिष्ठा उंचावल्याबद्दल मोदी सरकार कौतुकास व अभिनंदनास पात्र आहे, अशी भावनाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केली.

याच काळात भारतातील राजकीय नेते मात्र अपयशाचे खापर मोदी सरकारवर फोडण्याचा अपयशी प्रयत्न करीत होते व अपप्रचारात मग्न होते, अशी टीका आमदार प्रशांत ठाकूर यांनी कोणाचेही नाव न घेता केली. लसीकरणाबाबत जनतेत संभ्रम माजविण्याचे प्रयत्नही काही नेत्यांनी केले, परंतु भारतीय जनतेने मोदी सरकारवर दाखविलेल्या विश्वासामुळे असे नेते तोंडघशी पडले, असा टोला त्यांनी हाणला. कोविडशी झुंजत देश झपाट्याने पुढे जात असताना महाराष्ट्र सरकार मात्र शिक्षणव्यवस्थेस टाळे लावून अनेक नवे निर्बंध लादत राज्याला मागे नेत आहे, अशी खंतही आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केली.

## खांदा कॉलनी भाजप, युवा मोर्चाची कार्यकारिणी जाहीर

सिद्धेश खानावकर, उपाध्यक्षपदी अनिकेत गायकवाड, शशिकांत इंगळे, निलेश घाडगे, सचिवपदी राहुल कांबळे, विनोद अडसुले, खजिनदारपदी कौस्तुभ कुडेकर, सदस्य म्हणून सचिन धोत्रे, हृषिकेश साबळे, आकाश सोनावणे, राहुल पोवार, अजिंक्य टेमकर, मिलिंद घाडगे, अभिराज म्हात्रे, हर्षल सावंत, सोहम कनगुटकर, जयराम फड, मयूर वाघमारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आमदार प्रशांत ठाकूर व अन्य मान्यवरांच्या हस्ते सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी आणि सदस्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.


# पनवेलमध्ये स्वच्छता मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पनवेल महापालिकेच्या माध्यमातून प्रभाग समिती 'ड'च्या सभापती अ‍ॅड. वृषाली वाघमारे यांच्या उपस्थितीत प्रभाग क्रमांक १७ आणि २०मध्ये मंगळवारी (दि. १८) स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

पनवेल महापालिकेच्या माध्यमातून देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त महापालिका क्षेत्रात महापौर डॉ. कविता चौतमोल व सभागृह नेते परेश ठाकूर यांनी ५ स्टार रेटिंगमध्ये समावेश व्हावा यासाठी अनेक उपक्रम राबविण्यात येत आहे. यासोबतच स्वच्छ सर्वेक्षण २०२२मध्ये पनवेल महापालिकेच्या माध्यमातून चांगले काम करून स्वच्छ पनवेल सुंदर पनवेल करण्याच्या दृष्टीकोनातून पाऊले उचण्यास येत आहेत. त्यानुसार प्रभाग क्रमांक १७ आणि २०मध्ये मंगळवारी स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ करण्यात आला.

या वेळी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ, अजय बहिरा, तेजस कांडपिळे, माजी प्रभाग समिती सभापती तथा नगरसेविका सुशीला घरत, प्रभाग अध्यक्ष विजय म्हात्रे, आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, राकेश भुजबळ, क्रांतीकुमार चितळे, विजय भुजबळ, अनंत जाधव, किशोर शिंदे, सदाखत अली, पर्यवेक्षक रमेश गरुडे, शरद उरणकर, गौतम जाधव आदी उपस्थित होते.






**पनवेल महानगरपालिका**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,चे प्रकरण ११ व कराधान नियम ८, अन्वये ५ नुसार सुधारित कर आकारणीची हरकत नोंदविण्याकरिता मुदतवाढ देणेबाबत सूचना नोटीस.

**जाहीर सूचना (मुदतवाढ)**

पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती कार्यालय ''अ'' व प्रभाग समिती कार्यालय ''ब'' अंतर्गत वाढीव हद्दीतील पूर्वाश्रमीच्या तळोजा नोडमधील इनामपुरी, नागझरी पाडा, बिड, अडीवली, भोईरपाडा, सिद्धी करवले, पेथाली + कातकरवाडी, पापडीचा पाडा, पिसार्वे, देवीचा पाडा, ढोंगऱ्याचा पाडा, तुर्भे, पालेखुर्द, पडघे, तळोजा मजकूर, धानसर, धरणा कॅम्प, घोट, तोंढरे, कोयनावळे, तळोजा पाचनंद, रोहिंजन, फरशीपाडा, मोठा खांदा, धाकटा खांदा या ग्रामपंचायत व त्यामधील गटग्रामपंचायत क्षेत्रातील तसेच कळंबोली स्टील इंडस्ट्रीज, तळोजा औद्योगिक क्षेत्रामधील सर्व मालमत्ता धारकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की,

उपरोक्त ग्रामपंचायत, गट ग्रामपंचायत तसेच औद्योगिक क्षेत्रामधील मालमत्तांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ८ कराधान नियम क्र. ९ व १५ अन्वये आपल्या भोगवट्यातील इमारतीची व भूखंडाचे तपासणी व करमुल्यांकन करून प्रारूप करमुल्यांकन यादी वेळोवेळी प्रसिद्ध करुन करमुल्यांकनावर हरकत नोंदविण्याकरिता जाहीर प्रसिद्धीकरणापासून २१ दिवसांच्या कालावधीची मुदत देण्यात आली होती.

वाढत्या कोविड–१९ च्या प्रादुर्भावामुळे हरकत नोंदविण्याच्या कालावधीमध्ये ही नोटीस जाहीर प्रसिद्ध केल्यापासून दि. ११/०२/२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ८ कराधान नियम क्र. १५ अन्वये प्रत्येक करदात्यास विशेष नोटीस वैयक्तिक स्तरावर बजावण्यात आले आहेत व जाहीर प्रसिद्ध केलेली प्रारूप करमुल्यांकन यादी विभागीय कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध आहेत.

या बाबत आपल्या इमारतीचे किंवा जागेचे, करयोग्य मूल्य अथवा करआकारणी, क्षेत्रफळ तसेच मालकी हक्क इ. बाबत आपली काही हरकत असल्यास कारणासह लेखी अर्जाद्वारे उपायुक्त (मालमत्ता कर) पनवेल महानगरपालिका तसेच online हरकत नोंदविण्यासाठी ई–मेल – pmc.tax2016@gmail.com यांच्याकडे उपरोक्त मुदतीपर्यंत किंवा तत्पूर्वी कार्यालयीन वेळेस विभागीय कार्यालयात हरकत नोंदवून पोचपावती घ्यावी.

वरील मुदतीत लेखी हरकत / ई–मेलवर हरकत अर्ज प्राप्त न झाल्यास सदर आकारणी आपणास मान्य आहे असे गृहीत धरून करआकारणी प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तसेच उपरोक्त प्रमाणे सुधारित करमूल्यांकनाबाबत आपण हरकत न नोंदविल्यास अथवा सुनावणी हरकत नियमाला धरून नसल्यास सुनावणी अंती सुधारित चालू मागणी व सर्व मालमत्तांची सन २०२०–२१ पर्यंत वसुली व थकबाकी यांचे समायोजन करुन सर्व मालमत्ताधारकांना सन २०२१–२२ करीता सुधारीत देयक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,चे प्रकरण ८ नियम ३०, ३९ व ४० शास्तीसह यानंतर बजावण्यात येईल.

**टिप** :– वरीलप्रमाणे कुठल्याही मालमत्ताधारकांना / भोगवटाधारकांना हरकत नोंदवायची असल्यास सदर लेखी अर्जा/ Online(Pdf Copy) सोबत पुढील नमुद दस्ताऐवज जोडणे आवश्यक आहे.

१. आक्षेप संबंधित मुद्देनिहाय आक्षेप अर्ज.
२. मालमत्ते संबंधात मालकी हक्कांचे दस्ताऐवजाची स्वसाक्षांकित प्रत. (मालमत्तेची नोंद मनपा रेकॉर्डमध्ये नसल्यास)
३. सुधारित कर मूल्यांकन नोटीसची छायाप्रत.
४. यापूर्वी कर आकारणी झाली असल्यास मागील वर्षीचा कर भरणा केल्याची पावती.

**संपर्क अधिकारी :**
१) वंदना गुळवे (सहा–आयुक्त)
२) सुनिल मानकामे (विभाग प्रमुख–मालमत्ता कर विभाग)
भ्रमणध्वनी क्र :– १८००–५३२०–३४०
फोन नं. ०२२–२७४५८०४०/४१/४२
ई–मेल – pmc.tax2016@gmail.com

**सही/–**
**(गणेश देशमुख)**
**आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**

## कोरोना महामारीचा वाढता संसर्ग

# नवी मुंबईत रुग्णालये, बेड्सची सुविधा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या मार्गदर्शनानुसार पालिकेने आधीपासूनच कोरोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेची पूर्वतयारी सुरू केली होती. त्यानुसार कोविड केंद्रातील सर्वसाधारण, ऑक्सिजन बेड्सप्रमाणेच विशेषत्वाने दुसऱ्या लाटेत कमतरता जाणवलेल्या आयसीयू व व्हेन्टिलेटर्स वाढीकडे विशेष लक्ष देण्यात आलेले आहे. त्यानुसार नवी मुंबई पालिका स्वतःचे व खासगी मिळून तब्बल १२ हजार बेड्ससह सज्ज झाली आहे.

दुसऱ्या लाटेचा प्रभाव कमी होऊ लागल्यानंतर रुग्णसंख्येत होणारी घट लक्षात घेऊन काही कोविड केंद्रे तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आली होती. त्यामध्ये सिडको एक्झिबिशन कोविड सेंटर तसेच एमजीएम रूग्णालय सानपाडा कोविड सेंटर, सिडको कोविड सेंटरमधील आयसीयू सुविधा कार्यान्वित होती. तथापि रुग्णसंख्येत होणारी वाढ पाहता तात्पुरत्या स्वरूपात बंद केलेली इतर केंद्रेही एकेक करून कार्यान्वित करण्यात आलेली आहेत. यामध्ये राधास्वामी आश्रम तुर्भे येथे ३५८ ऑक्सिजन बेड्स तसेच एक्सोर्ट हाऊस तुर्भे येथे ४९२ ऑक्सिजन बेड्सची दोन्ही डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर्स पूर्ण क्षमतेने सुरू करण्यात आलेली आहेत.

पालिकेच्या कोविड केंद्रांमध्ये ५,१६४ सर्वसाधारण बेड्सची सुविधा कार्यान्वित करण्याची तयारी आहे. नमुंमपा डेडिकेटेड कोविड केअर सेंटर येथे ३,०५२ व खाजगी रूग्णालये येथे १,००० हून अधिक अशा ४,०५२हून अधिक ऑक्सिजन बेड्सची सज्ज्ता ठेवण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे नवी मुंबई महापालिकेच्या वतीने ७२५ आयसीयू बेड्स आणि खाजगी रूग्णालयातील ४७५ बेड्स अशाप्रकारे



(प्रातिनिधीक छायाचित्र)

१२०० हून अधिक आयसीयू बेड्सचे नियोजन करण्यात आलेले आहे. अशा प्रकारे एकूण १२ हजारांहून अधिक बेड्सची सज्ज्ता नवी मुंबई पालिकेने करून ठेवलेली आहे. तशा प्रकारचे निर्देश खाजगी रूग्णालयांनाही देण्यात आलेले आहेत. २४ तास कॉल सेंटरवर सुरू करण्यात आले आहे. दररोज ११ हजारांहून अधिक नागरिकांचे कोविड टेस्टींग करण्यात येत आहे.

सध्या ९२.१६ टक्के नागरिकांनी लसीचे दोन्ही डोस घेतले आहेत. प्रिकॉशन डोसला चांगला प्रतिसाद मिळत आहे. १५ ते १८ वर्ष वयोगटातील मुलांच्या लसीकरणालाही चांगला प्रतिसाद मिळाला असून ९०.२७ टक्के मुलांचे लसीकरण झाले आहे.

> **नवी मुंबई महानगरपालिका कोविड प्रतिबंधासाठी आवश्यक सर्व उपाययोजना करीत असून आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता सुसज्ज आहे. त्यामुळे नागरिकांनीही मास्कचा नियमित वापर करून कोरोनापासून स्वत:ला वाचवावे व कोविड प्रतिबंधात्मक नियमावलीचे काटेकोर पालन करून महापालिकेस सहकार्य करावे.**
>
> **–अभिजित बांगर, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

## पंतप्रधान मोदींविषयी बेताल वक्तव्य करणाऱ्या पटोलेंवर गुन्हा दाखल करा

### ■ कामोठे भाजयुमोची मागणी; पोलिसांना निवेदन

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल बेताल वक्तव्य करणारे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणीचे निवेदन भारतीय जनता युवा मोर्चाचे कामोठे शहर अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी कामोठे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षकांना दिले आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल बेताल वक्तव्य केले होते. पटोले यांनी मोदींना मारू शकतो आणि मोदीला शिव्या देऊ शकतो, असे बेताल वक्तव्य नागपूर येथील एका कार्यक्रमात केले. याचे सर्वत्र पडसाद उमटले आहेत.

देशाचे पंतप्रधान हे कोणत्या एका पक्षाचे नसून संपूर्ण भारताचे नेतृत्व करणारे सक्षम पंतप्रधान



व्यक्ती आहेत. त्यांच्याबद्दल असे बेताल वक्तव्य करणे हे देशद्रोही कृत्य आहे. त्याबद्दल आम्ही भारतीय जनता युवा मोर्चा कामोठे शहर मंडलतर्फे आपणास या पत्राद्वारे विनंती करतो की, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना कठोर शिक्षा व्हावी, जेणेकरून यापुढे कोणतीही व्यक्ती भारताच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी बेताल वक्तव्य करण्याची हिंमत करणार नाही. पंतप्रधान हे भारताचे सर्वोच्च पद आहे आणि या पदाचा आपण अभिमान राखला पाहिजे. हा अर्ज स्विकारून आम्हाला योग्य ते सहकार्य करावे, असे हर्षवर्धन पाटील यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

निवेदन देतेवेळी भारतीय जनता युवा मोर्चा कामोठे शहर अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, सरचिटणीस नवनाथ भोसले, चिटणीस प्रवीण कोरडे उपस्थित होते.

## नवनाथनगर, मालधक्का झोपडपट्टीची सभापती वृषाली वाघमारेंनी केली पाहणी

### ■ समस्या सोडविण्याच्या अधिकाऱ्यांना सूचना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'ड'च्या सभापती अ‍ॅड. वृषाली वाघमारे यांनी शहरातील नवनाथनगर व मालधक्का झोपडपट्टी येथील समस्यांची पाहणी करून अधिकाऱ्यांना कामे करवून घेण्याच्या सूचना केल्या.

पनवेलमधील नवनाथनगर झोपडपट्टी व मालधक्का झोपडपट्टी या ठिकाणी गटारांची व शौचालयाची दुरवस्था झाली असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आल्या होत्या. त्यानुसार प्रभाग समिती 'ड'च्या सभापती अ‍ॅड. वृषाली वाघमारे नवनाथनगर व मालधक्का



परिसरातील समस्यांची पाहणी केली. यानंतर त्यांनी गटारांची सफाई व दुरुस्ती तसेच शौचालयाची सफाई व दुरुस्ती करणे, नूतनीकरण करण्याच्या पनवेल महापालिकेच्या अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

या वेळी अ‍ॅड. वृषाली वाघमारे यांच्या समवेत वॉर्ड अधिकारी अमर पाटील, एसआय अभिजित गोवर, बांधकाम विभाग इंजिनिअर आकाश गायकवाड, आरोग्य विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते.

## महापे एमआयडीसीतून तंबाखू, गुटखा साठा जप्त

**पनवेल : वार्ताहर**

गुन्हे शाखा कक्ष-३ कडून ६० लाख ७२ हजार रुपयांचा प्रतिबंधित सुगंधीत तंबाखू व पानमसाला (गुटखा) साठ्यासह चार टेम्पो जप्त करण्यात आले आहेत. याप्रकरणी सात जणांना गजाआड करण्यात आले आहेत. या धडक कारवाईमुळे बेकायदेशीररित्या असा व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी यांना गोपनीय बातमीदारामार्फत महापे एमआयडीसी परिसरात मोठ्या प्रमाणात गुटख्याचा साठा करण्यात आला असून त्याची विक्री होणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार कक्ष ३ गुन्हे शाखेकडून गस्त व सापळा रचण्यात आला होता.

महापे एमआयडीसीमधील टाटा

**सात जण गजाआड**





मोटर्स परिसरातील पीएपीए २०२ या गोडावूनजवळ चार संशयीत टेम्पो दिसून आल्याने त्यापैकी एका टेम्पोची पाहणी केली असता त्यामध्ये विमल गुटखा मिळून आला. त्यानंतर चारही टेम्पोची तपासणी करता सदर ठिकाणी मिळून आलेल्या चारही टेम्पोमध्ये विमल गुटखा भरलेला आढळुन आला त्यांचेकडे अधिक चौकशी करता त्यांनी सदरचा विमल गुटखा त्या ठिकाणचे गोडावुनमधुन टेम्पोमध्ये भरल्याचे टेम्पोचालकांनी सांगितले.

गोडावूनमध्ये जाऊन पाहणी केली असता तेथेही गुटखा मिळुन आला. एकुण ४२,७२,००० रुपयांचा सुगंधी तंबाखू व पानमसाला (विमल गुटखा) व गुन्हा करण्याकरिता वापरलेली १८,००,००० रुपयांचे एकुण चार टेम्पो जप्त करण्यात आले आहेत. गुन्ह्यात एकुण ६०,७२,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त सात आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. यामध्ये आरोपी इसरार अहमद नियाज अहमद शेख (वय ४५, रा. ठाणे), सुरज हरिश ठक्कर (वय ४१, रा. डोंबिवली), सस्तु रामेत यादव (वय ३४, रा. उत्तर प्रदेश), नितीन बाबूराव कसबे (वय ४९, रा. मुलुंड), नौरुद्दीन अलिशौकत सय्यद (वय २६, रा. मानखुर्द), मोहम्मद नफिस रफिक शेख (वय ३४, रा. दहिसर), पवनकुमार पन्नालाल श्रीवास्तव (वय २७, रा . नवी मुंबई) हे आहेत.

## होमिओपॅथी संशोधन संस्थेचे रुग्णालय खारघरमध्ये सुरू

**खारघर : रामप्रहर वृत्त**

केंद्रीय होमिओपॅथी संशोधन संस्थाअंतर्गत आयुष मंत्रालयाच्या अधिपत्याखाली विभागीय होमिओपॅथी संशोधन संस्थेचे महाराष्ट्रातील पहिले रुग्णालय खारघरमध्ये सुरू झाले आहे.

रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून आयुष मंत्रालयाच्या सूचनेनुसार संबंधित रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) कार्यान्वित करण्यात आला आहे. यात आयुष रुग्णालयाचे प्रभारी संशोधन अधिकारी डॉ. रमेश बावस्कर हे काम पाहत आहेत.

नियोजनबद्ध उभारलेल्या या वास्तूचे काम केंद्र सरकारच्या निर्देशानुसार सिडकोने पूर्ण केले आहे. २० रुपयांची फी भरून रुग्णांना या ठिकाणी उपचार घेता येणार आहेत. खारघर सेक्टर १८ मध्ये प्लॉट नं. ३८, ३९ या भूखंडावर हे रुग्णालय आहे.


सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत ओपीडी सुरू असेल. लवकरच या ठिकाणी सोनोग्राफी, एक्स-रे, सिटी स्कॅन मशिनरीदेखील कार्यान्वित होणार असल्याची माहिती रुग्णालयाचे प्रभारी संशोधन अधिकारी डॉ. बावस्कर यांनी दिली. रुग्णालयात होमिओपॅथी पद्धतीने अद्ययावत उपचार केले जाणार आहेत. यामध्ये सर्व प्रकारच्या असाध्य रोगांचा समावेश आहे. अ‍ॅलर्जी आजारांवर याठिकाणी संशोधन केले जात असून त्याचा फायदा रुग्णांना होणार आहे.

## खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी शेअर मार्केटविषयी कार्यशाळा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील वाणिज्य विभागा अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी शेअर मार्केटमध्ये प्रविणता प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेस बी.एस.ई (बॉम्बे स्टॉक एक्सचेंज) चे प्रशिक्षक मुजबिर शेख हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. ही कार्यशाळा पाच दिवसांसाठी आयोजित करण्यात आली. या वेळी प्राचार्य डॉ. संजय मराठे यांनी शेअर मार्केटचे आजच्या काळात असलेले महत्त्व पटवून दिले. या वेळेस महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.





पाचव्या दिवशी या कार्यशाळेच्या समारोपाच्या वेळी बी.एस.ईचे क्षेत्रीय प्रमुख मुजम्मिल ईब्राहीम यांनी प्रशिक्षण दिले. महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे प्राध्यापक राहुल कांबळे यांनी या कार्यशाळेचे आयोजन केले, तसेच नम्रता गजरा यांनी सहकार्य केले. कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, तसेच प्रशिक्षण घेतल्याबद्दल विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देण्यात आले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ही कार्यशाळा विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी उपयुक्त आसल्याचे नमुद करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. संस्थेचे अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिध्देश्वर गडदे यांनी आयोजकांचे अभिनंदन केले.



## कळंबोलीत स्वच्छता आणि औषध फवारणी मोहीम

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

स्वच्छ भारत अभियानांतर्गत मंगळवारी (दि. १८) कळंबोलीत स्वच्छता व औषध फवारणी करण्यात आली.

कळंबोली सेक्टर १५ मधील रस्ते सफाई व फूटपाथ, माती व कचरा तसेच गवत काढणे, कामाला सुरुवात करण्यात आली. सेक्टर ८ मधील कालीमाता मंदिरापासून सरोवर सोसायटीपर्यंत नाल्यांमधील कचरा व नाल्याच्या बाजूचे गवत काढण्यात आले, तसेच नाल्यामध्ये औषध फवारणी करण्यात आली.

या वेळी प्रभाग समिती 'ब'च्या सभापती प्रमिला पाटील, भाजप कळंबोली शहराध्यक्ष रवीनाथ पाटील, नगरसेवक अमर अरुण पाटील, नगरसेवक बबन मुकादम व पालिका अधिकारी अरुण कांबळे, हरेश कांबळे व कर्मचारी आदी उपस्थित होते.


## खारघरमध्ये अवतरले फ्लेमिंगो... पक्षीप्रेमींमध्ये उत्साह

**नवी मुंबई : बातमीदार**

सुमारे १,००० दिवसांनी फ्लेमिंगो खारघर पाणथळ क्षेत्रात परतल्याने पक्षी निरीक्षक आणि निसर्गप्रेमींनी आनंद व्यक्त केला आहे. वास्तू विहार सोसायटीनजीक असलेल्या पाणथळ जागेत हे फ्लेमिंगो आढळून आले. मुख्य म्हणजे संक्रांतीच्या दिनी खऱ्या खुऱ्या पतंगांचे दर्शन झाल्याचे उदगार पक्षीप्रेमींनी काढले.

फ्लेमिंगोंचा वावर मुंबई, ठाणे, ऐरोली, नेरूळ एनआरआय व टीएस चाणक्य तसेच उरण पाणजे येथील पाणथळ जागेत सातत्याने पाहण्यास मिळतो. या भागात दरवर्षी हजारोंच्या संख्येने हे पक्षी येत असतात. त्यांना पाहण्यास पक्षी अभ्यासक दूरवरून येत गर्दी करत असतात. कांदळवने व त्यात असलेली जैवविविधता. यात कांदळवनात सुरू असलेले जलचरांचे निसर्गचक्र कायम सुरू असते. हे जलचर म्हणजे फ्लेमिंगोंचे आवडते खाद्य म्हणून ओळखले जाते. त्यासाठी हमखास हे फ्लेमिंगो हजारो मैलांचा प्रवास करून मुंबई, ठाणे, नवी मुंबई व उरण येथे असतात.

या भागात पक्षी पुन्हा परतून आल्याने निसर्गाकडून संक्रांत भेट मिळाल्याचा आनंद पक्षीप्रेमी आणि कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. संक्रांतीला पतंगांऐवजी सुंदर पक्षी उडताना पाहिले, अशी प्रतिक्रिया सीमा टोंक आणि ज्योती नाडकर्णी यांनी दिली.



> **निसर्गाचा समतोल राखायचा असल्यास दलदलीचे प्रदेश, कांदळवने आणि पाणथळ क्षेत्रांचे संवर्धन केले पाहिजे. खारघर परिसरातील कांदळवने आणि दलदलीला नष्ट करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची तक्रार शासन आणि उच्च न्यायालय नियुक्त कांदळवन समितिकडे याआधीच केली आहे. खारघर येथे फ्लेमिंगोचे झालेले दर्शन हा सुखद धक्का असून ही जैवविविधता टिकवणे व वाढवणे शासनाच्या हातात आहे.**
>
> **–बी. एन. कुमार, पर्यावरणवादी, नेट कनेक्ट फाउंडेशन**

> **खारघरमध्ये अगोदर कोल्ह्याची प्रजात गोल्डन जॅकलचे दर्शन घडले होते. निसर्ग आणि जैवविविधतेचा वारसा आहे. आपण त्याचा बचाव आणि संवर्धन केले पाहिजे तरच हे निसर्गाचे सुख आपल्याला व पुढच्या पिढीला अनुभवता येईल.अन्यथा हे पक्षी प्राणी पुढच्या पिढीला गुगलवर पाहावे लागतील अशी वेळ मानवाने आणू नये त्यासाठी शासनाने कायदे कठोर करावेत..**
>
> **–तरंग सरीन, पक्षी व कीटक अभ्यासक**

**पर्यावरणवाद्यांची हाक मुख्यमंत्री, पर्यावरणमंत्र्यांनी गांभीर्याने घ्यावी**

***राज्याला मुख्यमंत्री व पर्यावरणमंत्री यांनी पर्यावरणवाद्यांची हाक गंभीर्याने घेणे गरजेचे आहे. नेरूळ, खारघर, उरण येथील पाणथळ जागा वाचवण्यासाठी पर्यावरणवादी आदित्य ठाकरे यांची भेट घेण्याच्या तयारीत असल्याचे पर्यावरणवादी कार्यकर्त्यांनी सांगितले.***

## अल्पवयीन मुलीला फुस लावून पळविले

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील कोप्रोली येथे एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी गार्डनमध्ये फिरण्यासाठी गेली असता तिला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फुस लावून पळवून नेले.

कोप्रोली येथे राहणाऱ्या या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीची उंची पाच फुट, रंग सावळा, केस काळे लांब, डोळे काळे, नाक सरळ, बांधा मध्यम, उजव्या हातावर गोंदलेले असून अंगात पांढरे जॅकेट व काळी जीन्स तसेच पायात पांढरे स्पोर्टस् शुज घातलेले आहेत. तिला मराठी, हिंदी व इंग्रजी भाषा अवगत आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन पगार यांच्याशी संपर्क साधावा.

## मराठी भाषा जिल्हा समितीमध्ये पनवेलच्या आयुक्तांचा समावेश

**पनवेल : वार्ताहर**

प्रशासकीय कामकाजात मराठी भाषा वापरासंबंधीच्या तक्रारी व निवारणासाठी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा समिती स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये समितीचे सदस्य म्हणून पनवेल महापालिकेच्या आयुक्त गणेश देशमुख यांचा समावेश आहे.

मराठी भाषा समितीच्या अध्यक्षपदी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर हे असून उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव म्हस्के-पाटील हे सदस्य सचिवपदी आहेत. समितीचे सदस्य म्हणून जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) मकरंद प्रभाकर बारटक्के, सृजन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुजाता पाटील आदींची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती या समितीचे सदस्य सचिव उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव म्हस्के-पाटील यांनी दिली आहे.

## संपादकीय

# आशेची चाहूल

ओमायक्रॉनसह आलेल्या तिसऱ्या कोरोना लाटेने मुंबई आणि दिल्लीमध्ये उच्चांकी पातळी पार केली आहे, असे मत तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. या महानगरांमध्ये गेले काही दिवस सलगपणे दैनंदिन रुग्णसंख्येत मोठी घट होताना दिसते आहे. हे चित्र निश्चितच आशादायक असले तरी देशाच्या अन्य भागांतील परिस्थिती लक्षात घेता आपल्याला खबरदारी घेणे मात्र आणखी काही काळ सुरूच ठेवावे लागणार आहे.

**गेल्या काही दिवसांपासून मुंबई, तसेच राज्यभरातही कोरोना रुग्णवाढीचा वेग कमी होताना दिसतो आहे. कोरोना रुग्णांची दैनंदिन संख्या कमी होताना दिसू लागल्यामुळे तिसऱ्या लाटेने महाराष्ट्रात उच्चांकी पातळी पार केली असल्याची चर्चा निरनिराळ्या स्तरावर सुरू झाली आहे. अर्थात, राज्यात तिसऱ्या लाटेची तीव्रता कमी होताना दिसत असली तरी अद्यापही रुग्णांची संख्या सावधगिरी कायम राखावी इतपत निश्चितच आहे. विशेषत: मुंबईमध्ये बहुदा १५ जानेवारीच्या आसपास कोरोना संसर्गाने उच्चांकी पातळी पार केली असावी असा अंदाज कोविड टास्क फोर्सकडून व्यक्त केला गेला आहे. जानेवारी महिन्याच्या अखेरीपर्यंत मुंबई आणि राज्यात कोरोना रुग्णांची संख्या बरीच कमी होईल असा अंदाजही व्यक्त केला जात आहे. गणितीय मॉडेलच्या आधारे कोरोना संसर्गाच्या लाटेविषयी अंदाज बांधणाऱ्या आयआयटी कानपूर येथील प्राध्यापकांनीही मुंबई व दिल्लीतील लाट आता ओसरू लागली असून मार्च महिन्याच्या अखेरीस संपूर्ण देशभरात तिसरी लाट ओसरलेली दिसेल असा अंदाज व्यक्त केला आहे. मुंबई आणि दिल्लीत आता रुग्णसंख्या घटताना दिसत असली तरी अन्य शहरांमध्ये मात्र येते काही आठवडे ती वाढताना दिसेल असेही त्यांनी म्हटले आहे. महाराष्ट्र, गुजरात आणि हरयाणामध्ये तिसरी लाट या आठवड्यात उच्चांकी पातळी गाठेल, तर आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तामिळनाडू या दक्षिणी राज्यांमध्ये मात्र पुढच्या आठवड्यापर्यंत आकडे वाढताना दिसतील असा अंदाज आयआयटी कानपूरच्या प्रा. महिंद्र अग्रवाल यांनी व्यक्त केला आहे. कोरोनाचा व विशेषत: ओमायक्रॉनचा फैलाव अधिक असलेल्या देशांमधून येणाऱ्या प्रवाशांबाबत काटेकोर दक्षता घेतल्यामुळे संसर्गाला अटकाव करण्यास विशेष मदत झाल्याचे मत तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. अर्थात, तिसरी लाट आटोक्यात राहण्याचे सर्वाधिक श्रेय नि:संशयपणे लसीकरणालाच जाते. केंद्रातील मोदी सरकारने लसीकरणाच्या कार्यक्रमाचा चोख आराखडा आखून दिल्यामुळे देशात लसीकरणाने चांगला वेग घेतला. मुंबईसह राज्यभरात जनतेने लसीकरणाला चांगला प्रतिसाद दिल्यामुळे तिसऱ्या लाटेची तीव्रता आटोक्यात ठेवण्यास मोठा हातभार लागला. तिसऱ्या लाटेतील कोरोनाबाधितांपैकी लक्षणांची तीव्रता अधिक असणाऱ्यांमध्ये, तसेच मृत्यूमुखी पडणाऱ्यांमध्येही लसीकरण न झालेल्यांची संख्या ठळकपणे मोठी दिसते आहे. कोरोनापासून स्वत:ला सुरक्षित ठेवायचे असेल तर लस घेण्याला पर्याय नाही हे जगभरातच पुरते स्पष्ट झाले आहे. कोरोना महामारीच्या याआधीच्या दोन लाटांच्या दाहक आठवणी अजूनही लोकांच्या मनात जाग्या आहेत. त्यामुळे कोरोनाबाधितांची संख्या वाढू लागताच लोकांनी सरकारकडून प्रसारित नियमावलींचा यंदा सहज स्वीकार केला. या साऱ्याच्या एकत्रित परिणामातूनच तिसरी लाट लवकर आटोक्यात येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. अर्थात, राज्यात कोविडच्या चाचण्यांचे प्रमाणही कमी झाले आहे हेही लक्षात घ्यायला हवे. परिस्थिती आशादायक दिसू लागली असली तरी गाफिलपणा मात्र परवडणारा नाहीच.**

# लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी!

**खबरबात**
**नितीन देशमुख**



लाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी, जाहलो खरेच धन्य, ऐकतो मराठी धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी एवढ्या जगात माय मानतो मराठी, आमुच्या मनामनात दंगते मराठी आमुच्या रगारगात रंगते मराठी, आमुच्या उराउरात स्पंदते मराठी, असे आपण फक्त म्हणतो. म्हणूनच १४ ते २८ जानेवारी २०२२ हा कालावधी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करावा लागत आहे. या पंधरवड्याच्या निमित्ताने कथाकथन, काव्यवाचन अशा विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून मराठी भाषेचा जागर करण्यात येत आहे.

मराठी भाषेचे वय हे साधारणपणे १५०० शे वर्ष मानले जाते. या काळात समाज जीवनातल्या बदलानुसार ही भाषा बदलत राहिली, असे मानले ज़ाते. मराठी ही एक समृद्ध भाषा आहे. 'अमृतासही पैजा जिंके' अशा शब्दांत ज्ञानेश्वरांनी या भाषेचं कौतुक केलं होतं. जसा काळ बदलतो तसे भाषेमध्येही बदल होतात. बोली भाषादेखील तितक्याच समृद्ध आहेत. त्याची लाज वाटण्यासारखं काहीच नाही. उलट बोली भाषेमुळे आपण विशिष्ट प्रांतांची ओळख मोठी करतो. पैठण (प्रतिष्ठान) येथील सातवाहन साम्राज्याने महाराष्ट्री भाषेचा प्रशासनात सर्वप्रथम वापर केला. देवगिरीच्या यादवांचा काळात मराठी भाषा व संस्कृतीची भरभराट झाली. मराठी ही भाषा देवनागरी लिपीमधून लिहिली ज़ाते. देवगिरीच्या यादवांचे महाराष्ट्रावर राज्य असल्याने मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा होता. त्या काळात महानुभाव या पंथाची सुरुवात झाली. यामुळे संतांची परंपरा जन्मास आली व त्यांनी वेगवेगळ्या प्रकारे काव्यरचनेस सुरुवात केली. मराठी साहित्याचे दालन वैविध्यांनी समृद्ध केले. यादवांचे राज्य संपून मुसलमानी आक्रमकांचा काळ सुरू झाला. त्यांना स्थानिक लोक व भाषेचे काही कर्तव्य नव्हते. सरकारी भाषा फारसी झाल्याने मराठी भाषेत 'तारीख' सारख्या अनेक फारसी शब्दांचे आगमन झाले. अशा धकाधकीचा काळातही मराठी भाषेत साहित्याची भर पडली.

छत्रपती शिवाजी महाराज आणि पेशव्यांच्या काळात मराठी भाषेस राजाश्रय मिळाला. याकाळात मोरोपंतांनी मराठी भाषेत ग्रंथरचना केल्या. तसेच श्रीधर या कवीने आपल्या हरिविजय व पांडव प्रताप या काव्यांद्वारे खेड्यापाड्यात आपल्या मराठी कविता पोहोचवल्या. याच काळात शृंगार व वीररसांना स्वतंत्र स्थान मिळाले. यासाठी लावणी व पोवाडा हे नवीन वाङ्मय प्रकार मराठीत निर्माण झाले. याच काळात बखर लेखनाची सुरुवात झाली.

इ.स. १९४७ नंतर मराठीला अधिकृत राज्यभाषेचा दर्जा मिळाला. इ.स. १९६० मध्ये मराठी भाषिकांच्या एकसंध महाराष्ट्र राज्यास मान्यता मिळाली आणि मराठीस राजभाषेचा मुकुट प्राप्त झाला. मराठी भाषा मॉरिशस व इस्रायल या देशांतही बोलली ज़ाते. भारताच्या राज्यघटनेतील २२ अधिकृत भारतीय भाषांच्या यादीत मराठीचा समावेश आहे. मराठी ही महाराष्ट्र राज्याची एकमेव अधिकृत राजभाषा आहे. गोवा राज्यात कायद्यानुसार कोकणी ही राजभाषा असली तरी मराठीचा वापरही शासकीय कामकाजासाठी केला जातो. दादरा व नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशात मराठी एक अधिकृत राजभाषा आहे.

मराठी भाषेचं एक खास वैशिट्य म्हणजे तिच्या बोलीभाषा. मुंबई, पुणे, नाशिक अशा महाराष्ट्राच्या प्रमुख शहरांमध्ये अनेकजण मराठीमध्ये बोलतात पण विविधतेने नटलेल्या आपल्या भारतामध्ये दर १२ कोसानंतर संस्कृती बदलते आणि सोबतच भाषादेखील बदलते. मराठीप्रमाणेच प्रदेशागणिक बदलत जाणाऱ्या बोली भाषेची एक वेगळी ओळख आहे. काही लोकांची त्यावरून थट्टा होते पण आजकाल सिनेमा, टेलिव्हिजन क्षेत्रामध्ये बोली भाषेचा वापर वाढल्याने आता प्रांताच्या सीमा पुसट होऊन अनेकांनी ते शब्द नेहमीच्या बोलण्यात वापरायला सुरूवात केली आहे. मराठी ही एक समृद्ध भाषा असली तरीही तिच्या १३ खास बोलीभाषांची मज्जादेखील काही और आहे.

कोकण प्रांतात आणि प्रामुख्याने तळकोकणातील भाषा अत्यंत मधाळ आहे. हेल काढून आणि अनुनासिक उच्चार यामुळे या भाषेचा गोडवा काही और आहे. मालवणी नाटक आणि दशावतार यामुळे ही बोलीभाषा आज जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचली आहे. भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या भागांना 'झाडपट्टी' म्हणून ओळखलं जातं. त्यामुळे त्यांची बोलीभाषा 'झाडीबोली'. 'ण, छ, श, ष आणि ळ' ही पाच व्यंजने या भाषेत वापरलीच जात नाहीत. नागपूर, वर्धा, चंद्रपूर या भागांमध्ये नागपुरी भाषा थोड्या वेगळ्या लहेजाने बोलली जाते. या भाषेवर हिंदी आणि उर्दुचा प्रभाव आहे. जळगाव जिल्ह्यामध्ये खास अंदाजात भाषा बोलली जाते. या भाषेत नाद आणि लय असल्याने ती ऐकायलाही खास वाटते. अनेक सहित्यिकांनी त्याचा आपल्या लिखाणात वापर केला आहे. रावेर, जामनेर या भागामध्ये 'क' ऐवजी 'ख' बोललं जातं. बहिणाबाईंच्या कवितांमध्ये या भाषेचा अनेकदा वापर केलेला दिसून येतो. अहिराणी आणि तावडी सारखी वाटत असली त्यामध्ये फरक आहे.

मध्य कोकणात प्रामुख्याने आगरी भाषा बोलली जाते.कोळी बांधवांमध्ये ही भाषा प्रामुख्याने आढळते. रायगड, ठाणे या भागात अनेकजण आगरी भाषेमध्ये बोलतात. बुलढाणा, वाशीम, अकोला, यवतमाळ, अमरावती व वर्धा या सहा जिल्ह्यांतून वऱ्हाडी बोलली जाते. त्या भाषेत 'ड'चा 'ळ', 'ळ'चा 'य' म्हणून वापर केला जातो. भिल्ल समाज प्रामुख्याने देहवाली भाषेत बोलताना तुम्ही पाहिलं किंवा ऐकलं असेल. देहवालीच्या मूळ स्वरात 'ळ', 'क्ष' आणि 'ज्ञ' ही व्यंजने नाहीत, तर 'छ', 'श' आणि 'ष' यांच्याऐवजी 'स' हे एकच व्यंजन वापरले जाते. धुळे, नंदुरबार या भागात ही बोली वापरात आहे. मूळात रांगडेपणा हीच कोल्हापुरची ओळख असल्याने त्यांच्या भाषेमध्येदेखील रांगडेपणा दिसून येतो. थोडी खेडवळ आणि तरीही लय काढून बोलण्याची पद्धत असल्याने त्याला खास गोडवा आहे.

मराठी भाषेच्या विविध प्रकारांमध्ये पुणेरी मराठी ही व्याकरणशुद्ध म्हणून ओळखली जाते. सहित्य, कलाकार या विद्यानगरीमध्ये राहत असल्याने त्याचा प्रभाव येथील स्थानिकांवर दिसून येते. बेळगाव हा सीमाभागावरचा एक प्रांत आहे. कन्नड, चंडगडी, कोल्हापुरी, कोकणी अशा सगळ्याच भाषांची येथे भेसळ आहे. अनेक साहित्यिकांना बेळगावी भाषेचा त्यांच्या साहित्यामध्ये समावेश करण्याचा मोह आवरला नाही. उत्तर कोकणातील ठाणे जिल्ह्यात किनाऱ्यालगतच्या भागात वाडवळी बोली भाषा बोलली जाते. वसई भागातील स्थानिक प्रामुख्याने या भाषेचा वापर करतात.

मराठी भाषा महाराष्ट्राची केवळ राजभाषा नसून संस्कृती आहे. दक्षिणेकडील राज्य आपल्या भाषेसाठी जे करतात त्यापैकी आपण काहीच करीत नाही. सरकारी कार्यालयात मराठीतून कामकाज व्हावे, असे आदेश काढूनही काही न्यायालये वगळता त्याची कार्यवाही होत नाही. शाळा आणि महाविद्यालये बंद ठेवून त्यांना मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याचे आदेश देण्यात आपण धन्यता मानतो. मराठी शाळा गावोगावी बंद होत आहेत, ज्या सुरू आहेत त्या मरणासन्न अवस्थेत आहेत. मुलांच्या उज्वल भवितव्यासाठी मराठी माणसे मराठी शाळांकडे पाठ फिरवीत आहेत. मराठी शिकून नोकरीची शाश्वती नाही, मग कोण कशाला मराठी शिकेल. शासकीय नोकरीसाठी प्राथमिक शिक्षण मराठीत झालेल्यांना ६० टक्के जागा राखीव ठेवल्या आणि राज्यातील सर्व उद्योगांना ४० टक्के जागा सक्तीच्या केल्या तरच मराठी भाषा टिकून राहील. ज्यांची मुले इंग्रजी माध्यमात शिकतात ते पालक आपल्या बबली-बंटीला मराठी वाचता येत नाही, असे अभिमानाने सांगतात. त्यामुळे हा मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कागदावर तर राहणार नाही ना, अशी शंका आल्याशिवाय राहत नाही.

# 'मातृभाषा टिकवण्यासाठी प्रयत्न करावा'

**रोहे : प्रतिनिधी**

मानवाला स्वतःच्या भावना व्यक्त करण्यासाठी शब्दांची व वाणीची आवश्यकता भासते. म्हणून प्रत्येकाने आपली मातृभाषा टिकवण्यासाठी व तिचा जास्तीत जास्त वापर करण्याचा मनापासून प्रयत्न केला पाहिजे, असे प्रतिपादन रोहा तहसीलदार कविता जाधव यांनी केले.

जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी गठीत केलेल्या रायगड जिल्हा मराठी भाषा समितीच्या माध्यमातून १४ ते २८ जानेवारीदरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्ताने रोहा तहसील कार्यालयात घेतलेल्या कार्यक्रमात तहसीलदार जाधव बोलत होत्या. मानवी जीवनात मातृभाषेला खूप महत्त्व असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस संत ज्ञानेश्वर महाराजांच्या मूर्तीचे व पूजन करण्यात आले. या वेळी रोह्याचे सुपुत्र डॉ. चिंतामणराव देशमुख यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. जिल्हा भाषा समितीच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल रोह्याचे मकरंद प्र. बारटके यांचा या वेळी तहसीलदार कविता जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

हभप नारायण महाराज दहिंबेकर आणि मकरंद बारटके यांनी गीता किंवा ज्ञानेश्वरी या ग्रंथांचे महत्त्व विषद केले. शेवटी पसायदानाचे सामूहिक पारायण झाले. नायब तहसिलदार राजेश थोरे, मानसी साठे, सुखद राणे यांच्यासह वारकरी संप्रदायाचे अनुयायी व तहसील कार्यालयातील कर्मचारी या कार्यक्रमाला उपस्थित होते.



(छाया : महादेव सरसंबे)



(छाया : विनायक माडपे)

# खोपोली हाळवाडीत वृक्ष संवर्धन उपक्रम

## डॉ. धर्माधिकारी प्रतिष्ठानचा उपक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे खोपोली नगर परिषद हद्दीतील हाळवाडी येथे काही वर्षांपुर्वी वृक्षारोपण करण्यात आले होते. श्री सदस्यांनी नुकतेच या झाडांच्या परिसरात साफसफाई करून झाडांभोवती कुंपण घातले.

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या खोपोलीतील शेकडो श्री सदस्यांनी ज्येष्ठ निरुपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी आणि सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली काही वर्षांपुर्वी हाळवाडी येथे पूर्वी लावलेल्या झाडांच्या परिसरात साफसफाई केली, झाडांशेजारी वाढलेले गवत कापून झाडांच्या मुळांना खतपाणी घातले, या झाडांच्या भोवती कुंपण केले. त्यामुळे परिसर स्वच्छ होऊन वृक्षवाढीचा मार्ग मोकळा झाला. साफसफाई करण्यासाठी लागणारी सर्व अवजारे, साहित्य श्री सदस्यांनी स्वतः आणली होती. या उपक्रमात श्री सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## आरोग्य प्रहर

# कांद्याचा रस पिणे फायदेशीर

लोकांना अनेकदा कच्चा कांदा खायला आवडतो. तसेच कच्चा कांदा खाणे देखील आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. कच्चा कांदा खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. कांद्यामध्ये आढळणारे पोषक घटक रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात. सर्दी आणि फ्लूचा त्रास दूर करण्यासाठी आपण कांद्याचा रस घेतला पाहिजे. यामुळे सर्दी कमी होण्यास मदत होते.

कांदा आपल्यासाठी जितका फायदेशीर आहे. तितकाच कांद्याचा रसदेखील आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. ज्या लोकांना केस गळण्याची समस्या आहे. त्यांनी हा रस लावल्याने केस गळतीची समस्या दूर होण्यास मदत होते. तसेच सध्याच्या कोरोनाच्या वातावरणामध्ये कांद्याच्या रसाचे दररोज सेवन करा. यामुळे आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते आणि आपण कोरोनापासून दूर राहू शकतो.

कांदा हा तिखट अग्निदीपक, रुचकर कफोत्सारक, उत्तेजक, मूत्रल, कामोद्दीपक असा बहुगुणी आहे. कांद्यात कॅल्शिअम, ॲल्युमिन, लिग्नीन आणि अ, ब, क जीवनसत्त्व, गंधक, फॉस्फोरिक आम्ल, तंतुमय पदार्थ, स्निग्धता असे अनेक औषधी गुणधर्म आहेत.

कांद्याच्या रसाच्या सेवनाने अनेक मोठे आजार दूर होतात. कांद्याचा रस नियमित प्यायल्याने केवळ रक्तातील साखर संतुलित ठेवली जात नाही तर किडनी स्टोनच्या धोकाही कमी होतो.

लघवी थेंब थेंब होत असेल तसेच लघवी होताना जळजळ होत असेल तर एक कांदा अर्धा लिटर पाण्यात उकळून ते पाणी थंड झाल्यावर प्यावे. यामुळे लघवीची जळजळ थांबून लघवी साफ होते.

कांद्यामध्ये अँटी-एलर्जिक, अँटी-ऑक्सिडंट आणि अँटी-कार्सिनोजेनिक असे अनेक महत्त्वाचे गुणधर्म आहेत. यामुळे जर तुम्ही नियमीत कांद्याचा रस सेवन केलात तर रक्तातील साखर संतुलित राहण्यास मदत होईल.

लोकांना अनेकदा कच्चा कांदा खायला आवडतो. तसेच कच्चा कांदा खाणे देखील आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. कच्चा कांदा खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. कांद्यामध्ये आढळणारे पोषक घटक रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात.

सर्दी आणि फ्लूचा त्रास दूर करण्यासाठी आपण कांद्याचा रस घेतला पाहिजे. यामुळे सर्दी कमी होण्यास मदत होते.

कांद्या ठेचून तो पाण्यात उकळवून काढा करावा व हा काढा दोन चमचे घेऊन त्यामध्ये अर्धा चमचा मध घालावा व हे मिश्रण रात्री झोपताना प्यायल्यास चांगली झोप लागते.

**(टीप : या बातमीतील मजकूर प्राथमिक माहितीवर आधारित आहे, या माहितीचा वापर करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या)**

# नेरळमध्ये रक्तदान शिबिर



**कर्जत : बातमीदार**

नेरळ ममदापूर येथील सुमती चिंतामणी टिपणीस महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने महाविद्यालयात घेतलेल्या शिबिरात ३२ जणांनी रक्तदान केले.

विद्या मंदिर मंडळाचे कोषाध्यक्ष विवेक पोतदार यांनी या रक्तदान शिबिराचे उद्घाटन केले. अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयाच्या शासकीय रक्तपेढीचे डॉ. दीपक गोसावी आणि डॉ. अक्षय गोसावी आणि आरोग्य कर्मचारी यांनी सक्तसंक्रमण करून घेतले. या शिबिरात एकूण ३२ जणांनी रक्तदान केले. या वेळी एचआयव्ही तपासणीही करण्यात आली.

ममदापूरचे उपसरपंच अनिकेत गायकवाड यांनी रक्तदान शिबिराला भेट दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार इंगळे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रमोद विचवे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल सोनवणे, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. सोनम गुप्ता, प्रा. सागर मोहिते, प्रा. संतोष तुरुकमाने, डॉ. स्नेहल देशमुख, प्रा. दुराज टिवाळे, प्रा. अनंत घरत, प्रा. विकास घारे, प्रा. वैभव बोराडे, प्रा. धनंजय कोटांगळे, ग्रंथपाल जागृती घारे, आरती आवटे, नरेंद्र देशमुख, रवींद्र मगरे, दिपेश अगीवले, नामदेव निरगुडा यांच्यासह विद्यार्थी आणि विद्यार्थी स्वयंसेवक या वेळी उपस्थित होते.

# कर्जतमधील आश्रमशाळांत स्टुडंट पोलीस कॅडेट कार्यशाळा

**कर्जत : बातमीदार**

रायगड जिल्हा वाहतूक शाखेअंतर्गत असलेल्या स्टुडंन्ट पोलीस कॅडेट प्रोग्रॅम अंतर्गत कर्जत तालुक्यातील पिंगळस, पाथरज आणि चाफेवाडी येथील शासकीय माध्यमिक आणि उच्चमाध्यमिक आश्रमशाळांच्या मैदानांवर विद्यार्थी, विद्यार्थीनींना स्वतःचे रक्षण कसे करावे, या बाबत जिल्हा समादेशक ॲड. के. डी. पाटील यांनी कवायतीचे प्रशिक्षण दिले.

गुन्हेगारीपासून बचाव आणि नियंत्रण, मूल्य आणि नितीशास्त्र, कम्युनिटी पोलिसिंग, वाहतूक सुरक्षा, सामाजिक दुष्कर्माविरुद्ध लढा, महिला व मुलांची सुरक्षा, भ्रष्टाचाराविरुद्ध लढा, आपत्ती व्यवस्थापन, वडिलधाऱ्या माणसांचा आदर, संघात्मक कार्य (संघभावना), शिस्त या विषयांवर ॲड. पाटील सविस्तर मार्गदर्शन केले.तसेच पोलीस अंमलदार प्रदीप झेमसे यांनी स्टुडंन्ट पोलीस कॅडेट प्रोग्रॅम विषयी देण्यात आलेल्या पुस्तिकेचे व वाहतूक नियमन व ॲप विषयीच्या माहिती पत्रकाचे वाटप केले.



(छाया : संतोष पेरणे)

यावेळी या तिन्ही आश्रम शाळांचे मुख्याध्यापक संजय मागाटे, आर. एस. चव्हाण, महेश पाटील निबंध, चित्रकला, मैदानी स्पर्धा आयोजित करण्याबाबत मार्गदर्शन केले.

# पर्ससीन नेट मासेमारी धोरणाविरोधात रायगड जिल्ह्यातील मच्छीमार आक्रमक





**अलिबाग : प्रतिनिधी**

पर्ससीन नेट मासेमारी धोरणातील जाचक अटींमुळे मच्छीमारी व्यवसाय आर्थिक संकटात सापडला असून या धोरणाचा शासनाने पुन्हा विचार करुन जाचक अटी रद्द कराव्यात अशी मागणी वेस्ट कोस्ट पर्ससीन नेट वेल्फेअर असोसिएशनतर्फे रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

असोसिएशनचे संचालक रमेश नाखवा, आनंद बुरांडे, विश्वास नाखवा, कैलास चौलकर आदींनी निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे यांची भेट घेऊन त्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले. मागण्या मान्य न झाल्यास साखळी उपोषण करण्यात येईल. तरीही शासनाने दुर्लक्ष केले तर समुद्रात तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्याच्या जलधी क्षेत्राबाहेर मासेमारी करुन येणाऱ्या पर्ससीन बोटींना बंदरात ये-जा करायला व मासळी उतरायला सप्टेंबर ते मेपर्यंत परवानगी देवून भारताच्या संविधानात दिलेले मूलभूत अधिकार अबाधित ठेवावेत. पर्ससीन नौकांना नविन परवाने देण्याबरोबर जुन्या परवान्यांचे नुतनीकरण करुन देण्यात यावे. पर्ससीन नौकांवरील एकतर्फी होणारी कारवाई बंद करावी. सर्व मासेमारी प्रकारांचा सखोल अभ्यास झाल्याशिवाय पर्ससीन नौकांवरील कोणतीही कारवाई करु नये. सोमवंशी अहवालात पाच वर्षानंतर परत अभ्यास करावा असे नमूद असताना सरकार परत परत सोमवंशी अहवालाचा हवाला देऊन पर्ससीन नौकांवरती जाचक अटी लादत आहे ते त्वरीत बंद करण्यात यावे. आदी मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत.

# रोह्यातील कमानीला सी. डी. देशमुख यांचे नाव

## नागरिकांच्या भावनांपुढे पालिका प्रशासन झुकले





(छाया : जितेंद्र जाधव)

**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्याचे भूमिपूत्र व देशाचे पहिले अर्थमंत्री डॉ. चिंतामणराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त तालुक्यातील सुराज्य सामाजिक प्रतिष्ठान व राजमुद्रा फाउंडेशन यांच्या वतीने रोहा-कोलाड रस्त्यावरील कमानीला डॉ. चिंतामण देशमुख प्रवेशद्वार असे नाव देण्यात आले होते. परंतु नगरपालिकेने हे फलक त्याच रात्री हटवले. मात्र या कमानीला एका दिवसाच्या आत डॉ. सी. डी. देशमुख प्रवेशद्वार असे नाव द्यावे, अशी मागणी सुराज्य व राजमुद्रा यांनी नगरपालिकेकडे लेखी पत्राद्वारे केली होती. त्यानुसार नगरपालिकेने या कमानीचे डॉ. चिंतामण द्वारकानाथ देशमुख प्रवेशद्वार असे नामकरण केले.

रोहा-कोलाड रस्त्यावरील कमानीवर गेली अनेक वर्षे राजकीय बॅनर लावण्यात येत होते परंतु एकदाही रोहा नगरपालिकेने हे बॅनर खाली उतरले नाहीत. परंतु या कमानीवर डॉ. चिंतामणराव देशमुख प्रवेशद्वार असा बॅनर लावताच नगरपालिका प्रशासनाने तो काढून टाकला. यात सामाजिक संघटनांनी लक्ष घातल्यानंतर प्रशासनाला जाग आली.

# महाडमध्ये सर्दी, खोकल्याच्या रुग्णांत वाढ

**महाड : प्रतिनिधी**

गेली कांही दिवस सकाळी थंड आणि दुपारी कडक ऊन अशा वातावरणामुळे महाड तालुक्यात सर्दी, खोकल्याच्या रुग्णसंख्येत वाढ झाली आहे. त्यातच कोरोना आणि त्याबाबत सोशल मीडियावरील वाढत्या प्रचारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातवरण पसरले आहे. त्यामुळे घरीच उपचार घेण्याकडे रुग्णांचा कल वाढला आहे.

सकाळी थंडी तर दुपारी उष्मा असे वातावरण मानवी आरोग्यावर परिणामकारक ठरत आहे. यामुळे ताप, थंडी, खोकला अशा संसर्गजन्य आजारांचा त्रास अनेकांना होवू लागला आहे. यामुळे दवाखान्यात रुग्णांची संख्या वाढली आहे. तर दुसरीकडे कोरोनाचा फैलाव पुन्हा होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले आहे. नियमित खोकला असेल मिठाच्या पाण्याच्या गुळण्या, स्वच्छता, गरम पाणी पिणे हे पारंपारिक उपाय करणे फायदेशीर ठरत आहेत.

# नगरपंचायत निवडणुकीसाठी मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क

## पालीत मतदारांचा उत्साह

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्याचे मुख्यालय असलेल्या पाली नगरपंचायतीच्या चार जागांसाठी मंगळवारी (दि.१८) मतदान घेण्यात आले. दुपारी अडीच वाजेपर्यंत एकूण ५७ टक्के मतदान झाले होते.

चार जागांसाठी १४ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. चारही मतदान केंद्रांवर पोलिसांचा चोख बंदोबस्त होता. काही मतदार आपल्या लहानग्यांना सोबत घेऊन मतदानासाठी आले होते. मतदात्यांचा उत्साह चांगला होता.

मंगळवारी मतदान झालेल्या २, ५, ८ व १४ या चार प्रभागांचा आणि २१ डिसेंबरला मतदान घेतलेल्या १३ प्रभागांच्या निवडणुकीचा निकाल बुधवारी (दि. १९) लागणार आहे.



(छाया : धम्मशील सावंत)

## माणगावात सकाळपासून मतदारांच्या रांगा

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील नगरपंचायतीच्या उर्वरित चार जागांसाठी मंगळवार (दि. १८) सकाळपासूनच मतदारांनी मतदान केंद्रवर रांगा लागल्या होत्या.

माणगाव नगरपंचायतीच्या सदस्य पदाच्या १७ जागांपैकी १३ जागांसाठी २१ डिसेंबर रोजी मतदान घेण्यात आले आहे. उर्वरित वार्ड क्र.६, ८, १४ व १७ मधील चार जागांसाठी मंगळवारी मतदान घेण्यात आले. त्यासाठी सकाळी १० ते ११ या वेळेत मतदारांनी रांगा लावल्या होत्या. दुपारी मतदारांची गर्दी कमी झाली. चारही वार्डातील मतदान केंद्रावर चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. माणगावात कुठेही अनुचित प्रकार न घडता शांततेत मतदान झाले.

## पोलादपूरमध्ये १२ उमेदवारांचे भवितव्य 'इव्हीएम'मध्ये बंद



(छाया : शैलेश पालकर)

**पोलादपूर : प्रतिनिधी**

येथील नगरपंचायतीच्या दुसऱ्या टप्प्यातील उर्वरित चार प्रभागांतील एकूण १२ उमेदवारांचे भवितव्य मंगळवारी (दि. १८) इव्हिएम यंत्रामध्ये बंद झाले. या वेळी सर्वच मतदान केंद्रांमध्ये कोविड नियमावलीचे पालन करण्यात आले.

पोलादपूर नगरपंचायतीच्या प्रभाग २ मध्ये भाजपचे संभाजी माने, शिवसेनेचे मनोज प्रजापती आणि काँग्रेसचे कल्पेश मोहिते या उमेदवारांत लढत आहे. रयत शिक्षण संस्थेच्या पोलादपूर विद्यामंदिरामधील केंद्रात दुपारी दीड वाजेपर्यंत ३८० पैकी १४० मतदारांनी मतदान केले होते.

प्रभाग ८ मध्ये भाजपच्या रचना धुमाळ, शिवसेनेच्या सोनाली गायकवाड आणि काँग्रेसच्या अनिता जांभळेकर यांच्या तिरंगी लढत आहे. शंकरराव महाडीक न्यू इंग्लिश स्कूलमध्ये मतदान केंद्र असून, ३४८ मतदार आहेत.

प्रभाग १० मध्ये २८७ मतदार असून, तेथे भाजपचे प्रतिक सुर्वे, शिवसेनेचे प्रसाद इंगवले आणि काँग्रेसच्या शुभांगी चव्हाण यांच्यात लढत होत आहे. शहरातील प्राथमिक शाळा नं.१ मध्ये मतदान केंद्र आहे.

प्रभाग १४ मध्ये भाजपच्या अंकिता जांभळेकर, शिवसेनेच्या प्राची सुतार आणि काँग्रेसच्या प्रतिक्षा भूतकर यांच्यात लढत आहे. या प्रभागाचे मतदान केंद्र शहरातील प्राथमिक शाळा नं.१ मध्ये आहे. चारही प्रभागांमध्ये दुपारी दीडनंतर सरासरी ४५ टक्के मतदान झाल्याची नोंद झाली आहे.

# विहूरमध्ये तिवराच्या झाडांची कत्तल, ग्रामस्थांची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यांतील विहूर येथील सर्व्हे न. २०/१ (गट न. १११) लगतच्या जागेतील तिवराच्या झाडांची कत्तल करून समुद्रात भराव करणाऱ्यांवर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी विहुर ग्रामस्थांनी रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

तैझुन निसार हसोन्जी व त्यांच्या हस्तकांनी सीआरझेड कायद्याचे उल्लंघन केले असल्याचा आरोप विहुर ग्रामस्थांनी मुरूड तहसीलदार रोशन शिंदे यांच्या मार्फत जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केला आहे.

विहूर किनारपट्टीवरील तिवर झाडांचे क्षेत्र बंदिस्त केले जात आहे. मात्र येथील तिवराच्या झाडांची कत्तल करून तेथे मातीचा भराव टाकण्यात येत आहे. तसेच गेल्या सहा महिन्यापासून समुद्री शेवाळ, सि-ग्रास या वनस्पती नष्ट करण्यात येत आहेत. सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करून या ठिकाणी मोठ-मोठे लोखंडी पोल उभे करण्यात आले आहेत. सी-ग्रास व तिवराची झाडे नष्ट केल्यामुळे माशांचे प्रजनन व अधिवास धोक्यात आले आहे. विहूर ग्रामपंचायतीने हे बेकायदेशीर अतिक्रमण थांबवण्यासाठी संबंधितास नोटीसा दिल्या. मात्र जिल्हा प्रशासन, एमटीडीसी, वन विभाग आणि मेरिटाईम बोर्ड या सर्वांनी आजपर्यंत त्याकडे दुर्लक्ष केल्याचे निवेदनात म्हटले आहे.

त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी थेट संबंधितावर फौजदारी गुन्हा दाखल करणे कायद्याला अपेक्षित होते परंतू उद्योजक तैजून यांचे स्थानिक लोकप्रतिनिधी व महसूल सरकारी कार्यालयातील अधिकाऱ्यां सोबत मैत्रीचे घनिष्ठ संबंध असल्यामुळे आज पर्यंत कोणतीही कायदेशीर कारवाई होत नाही असे ग्रामस्थांचे मत आहे .

सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करून या ठिकाणी बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्या तैजून निसार हसोन्जी याच्या विरुद्ध फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी विहुर ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. याबाबत विहूर ग्रामस्थांनी मुरुड तहसील कार्यालयाससुद्धा निवेदन दिले आहे.



(छाया : संजय करडे)

## नागोठणे गोमांसप्रकरणी आरोपींना पोलीस कोठडी

**नागोठणे :** कोणतीही आवश्यक ती कागदपत्रे जवळ नसताना गोवंश जातीच्या प्राण्यांची कत्तल करून ते विक्रीसाठी अवैधरित्या मुंबई नेणाऱ्या पाच जणांच्या टोळीला नागोठणे पोलिसांनी रविवारी (दि. १६) जेरबंद केले होते. या गुन्ह्यातील आरोपींना रोहे येथील कनिष्ठस्तर न्यायालयात हजर केले असता त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असल्याची माहिती नागोठणे पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक नारायण चव्हाण यांनी दिली.


**नमुना एन. डी.**
**(नियम ९२ (३) पहा)**

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH 2020-CC-1923 A मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH 46 BD 7930 चे मालक श्री. ज्योतिष दामोदर स्वाईन यांचे दिनांक ०४/०७/२०२१ रोजी निधन झालेले आहे.

मी, सपना ज्योतिष स्वाईन, पत्ता : पोस्ट आपटा पिंपळ आळी, ता. पनवेल, जि. रायगड. महाराष्ट्र ४१० २०७.

उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेल महानगरच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव : सपना ज्योतिष स्वाईन**
**पत्ता : पोस्ट आपटा पिंपळ आळी, ता. पनवेल, जि. रायगड. महाराष्ट्र ४१० २०७.**


# खालापुरात घर तिथे लसीकरण! तहसील कार्यालयाची मोहीम



(छाया : अरुण नलावडे)

**खालापूर : प्रतिनिधी**

तहसील कार्यालय खालापुर येथे मंगळवार (दि. १८) VACCINE ON WHEEL या मोहीमेचा शुभारंभ कर्जत उपविभागाचे उपविभागीय अधिकारी अजित नैराळे व खालापुरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांच्या हस्ते करण्यात आला.

या मोहीमे अंतर्गत प्रथमच गावोगावी, वाड्यावस्त्यांवर प्रत्यक्ष नागरिकांना संपर्क साधून त्यांचे कोविड १९ लसीकरण करण्यात येणार आहे. वृध्द, दिव्यांग तसेच दुर्धर आजारामुळे लसीकरण केंद्रावर जाऊ न शकणारे नागरिकांनादेखील याचा लाभ होणार आहे.

सदरची मोहीम राबविण्यासाठी अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज अशी रुग्णवाहिका VACCINE ON WHEEL या संस्थेव्दारे पुरविण्यात आलेली असून सदर रुग्णवाहिकेसोबत मोहीमेचे समन्वयक अमित पवार व एक डॉक्टर, दोन आरोग्य सहाय्यक, एक आशा सेविका यांचे पथक कार्यरत असणार आहे. जिल्हा परिषद रायगड व VACCINE ON WHEEL संस्था यांनी या बाबत सामजस्य करार केला आहे. सदर मोहीमेसाठी लागणारा सर्व निधी CIPLA FOUNDATION यांच्यामार्फत पुरविला जाणार आहे.

या संस्थेव्दारे आजतगायत पनवेल तालुक्याच्या ग्रामीण भागात सात हजार लोकांचे लसीकरण पुर्ण करण्यात आले असून रायगड जिल्ह्यातील अन्य तालुक्यात टप्प्याटप्प्याने VACCINE ON WHEEL या मोहीमेअंतर्गत लसीकरण सुरु करण्यात येणार आहे. सदर मोहीमेची अंमलबजावणी तालुका आरोग्य अधिकारी यांच्याशी समन्वय साधून शासन निकषानुसार करण्यात येणार आहे.

या मोहीमेच्या शुभारंभाला खालापूर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद रोकडे, राजश्री जोगी, नायब तहसीलदार रश्मी चव्हाण, नगरपंचायत मुख्याधिकारी अनुप नागरे, सिप्ला फाऊंडेशनच्या उल्का धुरी, विनायक काळे, सुनिल मकरे उपस्थित होते.

या मोहीमेचा खालापूर तालुक्यातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन तालुका प्रशासन आणि आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले.


*वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी*
राम प्रहर



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Re-E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000021806** **Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/ Re-e-Tender-62/2021-2022** RFx e-tender for work of construction of 1 No. of 22kV Tupgaon Feeder at 100kV Bhokarpada substation under EHV(O&M) Dn.Panvel. **Tender amount Rs. 5,97,525/-, EMD amount Rs. 5,975/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **19.01.2022, 17:00 Hrs. to 26.01.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 26.01.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **27.01.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

# भारत-दक्षिण आफ्रिका यांच्यात आज पहिली वन डे



**पर्ल : वृत्तसंस्था**


कसोटी मालिकेनंतर भारत आणि यजमान दक्षिण आफ्रिका यांच्यात आता एकदिवसीय मालिका रंगणार आहे. तीन सामन्यांच्या या मालिकेतील पहिला सामना बुधवारी (दि. १९) पर्ल येथील बोलंड पार्कवर खेळवण्यात येणार आहे.

कसोटी मालिकेत पराभूत झालेला भारतीय संघ के. एल. राहुलच्या नेतृत्वाखाली एकदिवसीय मालिकेत छाप पाडण्यासाठी उत्सुक आहे. रोहित शर्माच्या अनुपस्थितीत राहुलच्या साथीने अनुभवी शिखर धवन सलामीला येण्याची शक्यता आहे. महाराष्ट्राच्या ऋतुराज गायकवाडला एकदिवसीय पदार्पणाची संधी मिळणार का, हे पाहणेही रंजक ठरेल. विराट कोहली तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करेल.

भारताकडून चौथ्या स्थानावर फलंदाजी करण्यासाठी श्रेयस अय्यर आणि सूर्यकुमार यादव या मुंबईकरांपैकी कुणाला प्राधान्य मिळणार याकडे चाहत्यांचे लक्ष लागले आहे. चौथ्या स्थानासाठी श्रेयसचे पारडे जड मानले जात आहे. श्रेयसला २०१८च्या आफ्रिका दौऱ्याचाही अनुभव आहे.

# बंगालचा थरारक लढतीत तेलुगू टायटन्सवर विजय

## प्रो कबड्डी लीग



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

रंगतदार झालेल्या प्रो कबड्डी लीगमधील सामन्यात गतविजेत्या बंगाल वॉरियर्सने तेलुगू टायटन्सचा २८-२७ असा पराभव केला. बंगालच्या मनिंदर सिंगने १० गुण घेत संघाच्या विजयात बहुमुल्य योगदान दिले, तर रण सिंहने बचावात चार गुण घेतले. टायटन्स संघाकडून रजनीश दलालने ११ गुण घेतले खरे, पण तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही.

टायटन्स विरुद्ध बंगाल सामन्याचा पूर्वार्ध अत्यंत संथ होता. बंगालने पूर्वार्धात एका गुणाची आघाडी घेतली होती. दोन्ही संघांच्या बचावफळीला प्रत्येकी सहा टॅकल पॉइंट मिळाले. पूर्वार्धात संयमी राहिलेल्या मनिंदर सिंगने उत्तरार्धात शानदार पुनरागमन केले आणि टायटन्स संघासाठी सलग नववा सुपर-१० पूर्ण केला. त्याच्या या कामगिरीने बंगालला अंतिम क्षणांमध्ये तीन गुणांची आघाडी मिळवून दिली.

रजनीशने घेतलेल्या ११ गुणांमधील सात गुण बोनस म्हणून घेतले. आकाश आणि संदीप कंडोला यांना प्रत्येकी चार टॅकल पॉइंट मिळाले. १० सामने खेळलेला तेलुगू टायटन्सला अजून एकही विजय मिळवता आलेला नाही. त्यांनी आठ सामन्यांत पराभव पाहिला असून दोन सामन्यांत बरोबरी पत्करली आहे. ते गुणतालिकेत सर्वांत तळाशी आहेत.

# लेजेंड्स क्रिकेट लीगसाठी भारतीय संघाची घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लेजेंड्स क्रिकेट लीग ही निवृत्त खेळाडूंची स्पर्धा ओमानमध्ये २० जानेवारीपासून सुरू होणार असून २९ जानेवारीपर्यंत चालेल. या स्पर्धेसाठी भारतीय खेळाडूंचा समावेश असलेल्या इंडिया महाराजास संघाची घोषणा करण्यात आली आहे.

भारताव्यतिरिक्त रेस्ट ऑफ द वर्ल्ड आणि आशिया लायन्स हे संघही असतील. शोएब अख्तर, सनथ जयसूर्यासारखे दिग्गज आशियाकडून खेळताना दिसणार आहेत.

याआधी सचिन तेंडुलकर या स्पर्धेत सहभागी होणार असल्याची अटकळ बांधली जात होती, मात्र नंतर तेंडुलकर या स्पर्धेत सहभागी होणार नसल्याचे समोर आले. असे असले तर वीरेंद्र सेहवाग, हरभजन सिंग आणि युवराज सिंग यांच्यासह अनेक खेळाडू असतील, जे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दिसले आहेत.

तीन संघांची ही स्पर्धा खूपच रंजक होण्याची अपेक्षा आहे. संघांची घोषणा करण्यात आली आहे. सर्व सामने भारतीय वेळेनुसार रात्री ८ वाजता सुरू होणार आहेत.

**इंडिया महाराजास संघ**

वीरेंद्र सेहवाग, हरभजन सिंग, युवराज सिंग, इरफान पठाण, युसूफ पठाण, एस बद्रीनाथ, आरपी सिंग, प्रज्ञान ओझा, नमन ओझा, मनप्रीत गोनी, हेमांग बदानी, वेणुगोपाल राव, मुनाफ पटेल, संजय बांगर, नयन मोंगिया, अमित भंडारी.









## अभिष्टचिंतन..!

पनवेल : पंचायत समिती सदस्य तथा भाजप महिला मोर्चाच्या तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत यांना वाढदिवसानिमित्त भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत आणि ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात घरत यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. नगरसेविका हेमलता म्हात्रे, महिला मोर्चाच्या लीना पाटील, प्रतिभा ठाकूर, सारिका म्हात्रे, गीता मंजुळे, प्रतिभा भोईर, स्नेहल खरे, मयुरी उनडकट, शिल्पा म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्या महिला उपस्थित होत्या.









# इंग्लंड-ऑस्ट्रेलियाच्या क्रिकेटपटूंचा धिंगाणा

## पोलिसांनी काढले हॉटेलबाहेर!

**होबार्ट : वृत्तसंस्था**

अ‍ॅशेस कसोटी मालिका संपल्यानंतर ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडच्या खेळाडूंनी होबार्टमधील हॉटेलमध्ये रात्रभर पार्टी करून गोंधळ घातला. यामुळे पोलिसांना पाचारण करावे लागले. पोलिसांनी ही पार्टी बंद केली. त्याचा एक व्हिडीओ इंटरनेटवर व्हायरल होत आहे.

फॉक्स स्पोर्ट्सच्या रिपोर्टनुसार या पार्टीत इंग्लंडचा कर्णधार जो रूट आणि जेम्स अँडरसन यांच्याशिवाय ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू अ‍ॅलेक्स कॅरी, ट्रॅव्हिस हेड आणि नॅथन लायन यांचा समावेश होता. व्हिडीओमध्ये खेळाडूंना मद्यपान थांबवण्यास सांगितले जात आहे. भिंतीवरच्या घड्याळात पहाटे ६.३० वाजले आहेत. रविवारी अ‍ॅशेस मालिका संपल्यानंतर पार्टी करण्यासाठी क्रिकेटपटू रात्रभर जागे राहिल्याचे यावरून दिसून येते.

व्हिडीओमध्ये पोलीस अधिकारी सांगत आहेत, खूप आवाज झाला आहे. तुम्हाला आधीच पार्टी थांबवायला सांगितली होती. त्यामुळे आता आम्हाला इथे यावे लागले. डेली टेलिग्राफच्या वृत्तानुसार खेळाडूंनी गैरवर्तन केले नाही, तर गच्चीवर खेळाडू मोठ्या आवाजात संगीत ऐकत होते. या आवाजावरून तक्रार करण्यात आली. तस्मानिया पोलिसांच्या माहितीनुसार या तक्रारीनंतर अधिकाऱ्यांनी खेळाडूंना क्राउन प्लाझा हॉटेलमधील बारमधून बाहेर काढले.

अ‍ॅशेस मालिकेत यजमान ऑस्ट्रेलिया संघाने इंग्लंडचा ४-० असा पराभव केला. मालिकेत पाहुण्या संघाची कामगिरी अत्यंत खराब राहिली.

# राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ४

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअ‍ॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. मोबाईल सेवा पुरविणारी भारतातील सर्वात मोठी कंपनी कोणती आहे?**
***अ.)*** जिओ ***ब.)*** भारती एअरटेल ***क.)*** व्होडाफोन आयडिया ***ड.)*** टाटा टेलिकम्युनिकेशन

**२. पुढीलपैकी कोणती संस्था शेअर बाजाराशी संबंधित नाही?**
***अ.)*** सेबी (सेक्युरिटीज अ‍ॅड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया)
***ब.)*** सीडीएसएल (सेन्ट्रल डीपॉजिटरी सर्व्हिसेस इंडिया लिमिटेड)
***क.)*** आयइएक्स (इंडिया एनर्जी एक्सचेंज)
***ड.)*** बीएसई (बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज)

**३. भारतीय शेअर बाजारात या क्षेत्रातील कंपन्यांचे मूल्य सध्या (डिसेंबर २०२१) सर्वाधिक आहे.**
***अ.)*** बँक ***ब.)*** आयटी ***क.)*** एफएमसीजी ***ड.)*** एनर्जी






**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा.**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com